म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८२२०
सन १९२२

# श्रीसयाजीवृत्तरत्नमंजूषा.

## ( संगीत बाल्यचरित्र. )

REFBK-0002152

रामराव मा. भां.

Marathi Grantha
Sangrahalaya
Thana.

To
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे

from [illegible]

REFBK-0002152

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. [illegible]



A small poem on the historical excellence of the Memoir of His Highness Shri Sayajee Rao Maharaja saheb Gaikwad up to His Highness' accession to the throne with full Royal Power.

# श्री सयाजीवृत्तरत्नमंजूषाकाव्य

अथवा

## संगीत व सचित्र
## बाल्य चरित्र.

(सटिक)

ग्रंथ संग्रहालय
ता. क. 2752

(श्रीसयाजीराज्यशासनपद्धति व श्रीसयाजीप्रशस्ति या काव्यांसहित)

**श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड**

यांचे आश्रयाखालीं हें पुस्तक

**रामराव मार्तण्ड भांबुरकर-बडोदें**

(संगीत शिवगौरीविजय, संगीत गंगालहरी, दीर्घायू कसें व्हावें, अब्राहाम लिंकन, श्रीसयाजी वैभवानंदलहरी (मराठी भाषेचा महिमा) इत्यादि पुस्तकांचा कर्ता, यानें तयार करून

प्रसिद्ध केलें आणि त्यांचेसाठीं भ. ब. पाळेकर यांनीं

जागृति-प्रेस-बडोदें रावपुरा येथें छापिलें.

ता. १४ जानेवारी १९२२. शके १८४३. संवत १९७८.

किंमत ०-८-०

( सर्व हक्क पुस्तककर्त्यांनें स्वाधीन ठेविले आहेत. )

श्री.

॥ मालिनी ॥

॥ विविधगुणकलानां ज्ञानसंवर्धनाय ॥
॥ वितरति निजलोके यः सुविद्याप्रकाशम् ॥
॥ भरतभुवनलोकाग्रेसरत्वार्हणीयो ॥
॥ जयतु जयतु लोके लोकबंधुः सयाजिः ॥१॥

# श्रीमंत सरकार

## श्रीसयाजीराव महाराज गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादूर महाराजांचे चरणसेवेशीं

महाराजांचे अनेक सद्गुण व प्रजावात्सल्य
यांचा द्योतक असा हा किंचित् प्रयत्न
श्रीमकरसंक्रांतीच्या सणाप्रीत्यर्थ
प्रेमादरविनयपुरस्सर अर्पण
करीत आहें.

आज्ञांकित नम्र सेवक,

**रामराव मार्तंड भांबुरकर.**

# अभिप्राय.

**श्रीसयाजीवृत्तरत्नमंजूषाकाव्य** मीं आजरोजीं वाचलें. हें **सयाजीरावमहाराजांचें** बाल्यचरित्र आहे; तें वाचून समाधान झालें. भाषासरणी फार साधी आहे. गायकवाडी स्वराज्यांतील मराठी शाळांतील मुलांकडून हें पाठ करविल्यानें त्यांचेठायीं राजभक्तीचें बीजारोपण होईल. समग्र चरित्राचें असें काव्यरूप त्रोटक समालोचन तयार झालें तर फार चांगलें होईल. पद्यें रागांत बसविलीं असल्यामुळें तीं गातां येतील; व त्यामुळें विशेष मधुरता येईल.

**बडोदें,**
ता. १२-१-१९१७

(सही) हरि नारायण आपटे
(कादंबऱ्यांचे कर्ते व पुणें
आनंदाश्रमाचे मालक).

॥ श्री ॥

# उपोद्घात.

॥ बालोऽपि नावमंतव्यो मनुष्य इति भूमिपः ॥
॥ महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति ॥ १ ॥

( मनुस्मृति अ. ७, श्लो. ८ ).

श्रुतिस्मृति, इतिहास, पुराणें वगैरे आपल्या पूर्वकालीन ग्रंथांनीं राजाचे ठायीं इतकी पूज्यबुद्धि व्यक्त केली आहे कीं राजा हा आमच्या सारखाच मनुष्य आहे अशा बुद्धीनें तो जरी वयानें लहान असला तरी त्याचा उपमर्द करू नये; कारण तो कोणी एक महापूज्य व पवित्र देवताच आहे व ती पुरुषरूपानें राजा हा अधिकार पत्करून आपणावर राहिली आहे.

२ सांप्रतच्या लघुकाव्याचे लेखक रा. रामराव मार्तंड भांबुरकर हे आज २५ वर्षें झालीं **श्रीमंत सरकार सयाजीराव महाराजसाहेब गायकवाड** यांच्या चरणारविंदीं प्रतिवर्षीं श्रीमकरसंक्रांतीचे सुप्रसंगीं अभीष्टप्रद पद्यें अव्याहत अर्पण करीत आले आहेत; आणि त्यांची वेळोवेळीं बूज होऊन त्यांस त्याबद्दल उत्तेजनही मिळत गेलें आहे अधुनिक विद्वान् पंडितांनीं आर्य-

लोकांचें मूळ वसतिस्थान उत्तर ध्रुवाजवळ होतें असा तर्क केला आहे व तेथें वर्षाचे ६ मास रात्र व ६ मास दिवस असतो असें सुप्रसिद्ध आहे. ६ महिन्याची कष्टमय रात्र संपल्यानंतर भगवान सूर्यनारायणाचें आल्हादकारक किरण जेव्हां जमीनीचे पृष्ठभागावर पडतें तेव्हां स्वाभाविकच सर्वांस अत्यानंद होई. ह्या अत्यानंदा प्रीत्यर्थ हल्लींचा मकरसंक्रमणाचा महदुत्सव पाळण्यांत येत आहे. संक्रांतीच्या पुण्यकाळांत स्नानदानादि पुण्यकर्मे आचरण्याचा व देवतांची पूजा करण्याचा धार्मिक प्रचार आणि थोर आप्तस्वकीयांच्या भेटीचा लाभ घेऊन त्यांस शर्करामिश्रित तिळ देऊन प्रेम वाढविण्याचा प्रघात रूढ झाला आहे. अशा मंगलदायक प्रसंगीं रा. रामराव मार्तंड भांवुरकर हे **श्री. स. सयाजीराव महाराज साहेब गायकवाड** ह्या नृपेंद्र महादेवतेची पद्यरूप सुवासिक पुष्प-गुच्छांनीं भक्तिपुरस्सर पूजा व एकनिष्ठेनें राजसेवा करीत आहेत हें समयास यथोचितच आहे.

३. राज्यरूप छत्राचा दांडा हातांत धरण्याचे श्रम अहोरात्र सहन करून जे उभे आहेत असे पुण्यश्लोक राजे, साधुसंत व राजकार्यधुरंधर असे महापुरुष यांची जीवनचरित्रें श्रवणरमणीय व बोधपर असतात. ॥ **प्रसादचिन्हानि पुरः फलानि** ॥ या उक्तीस अनुसरून जन्मापूर्वी भावी मोठेपणाच्या कल्याणाचे अंकुर कसे व्यक्त होतात व तेच अंकुर बाल्यांत, तारुण्यांत व वार्ध-

ग्रं. ३।३।१००६



क्यांत वाढत जाऊन त्यांचा महान् उपयोगी व उदार वृक्ष कसा तयार होतो हें त्या चरित्रांतील वेळोवेळीं घडून आलेल्या हृदयंगम गोष्टीवरून स्पष्ट कळून येते.

४. प्रस्तुतच्या काव्याचें नांव ॥ **श्री सयाजीवृत्तरत्न-मंजूषा** ॥ असें ठेविलें आहे. हल्लीं हें काव्य आजपावेतोंच्या हकीकतीचें जरी नाहीं तरी पण काव्यकारानें **श्री. स. सयाजीराव महाराजसाहेब** यांचें जीवनचरित्र काव्यरूपानें लिहिण्यास प्रारंभ केला आहे हा प्रयत्न अभिनंदनीय असून लेखकाची ही कल्पना मोठ्या उदात्त मनोविकाराची आहे. या लघुकाव्यांत तूर्त श्रीमंत सरकार यांच्या पूर्व पीठिकेपासून राज्यपदारूढ होई पावेतोंच्या हकीकतीचें थोडक्यांत वर्णन सुरेख साधलें आहे; त्यांत मुख्यत्वेंकरून श्रीमंत सरकार यांची कोणते वंशांत उत्पत्ति झाली, जगदुद्धारार्थ गोकुळांत नंदाच्या घरीं श्रीगोपालकृष्णाचा अवतार झाला त्याच्याशीं श्रीमंत सरकार यांची तुलना केली आहे, गायकवाड या आडनांवाची उत्पत्ति व त्याची पूर्वपीठिका, जन्मापूर्वीं भावी कल्याणसूचक श्रीमंतांच्या मातुश्रीस होणारीं चांगलीं लक्षणें, श्रीमंतांची जन्मकुंडली, त्यांच्या बाल्यावस्थेंतील भावी वैभवसूचक करमणुकी, लोकांत राजैश्वर्याच्या असणाऱ्या रूढ कल्पनेचा बालपणांत प्रादुर्भाव, दत्तकाच्या निवडणुकींत श्री. सरकार यांचीच पसंती होण्याजोगे असलेल्या गुणांचें वर्णन वगैरे भाग उत्तमच वठले आहेत.

५. **श्रीमंतांचें** जीवनवृत्त गद्यरूपानें लिहिण्याचे प्रयत्न झालेले आहेत पण पद्यरूपानें लिहिण्याचा प्रयत्न कोणीही केलेला नसून हा प्रथमच आहे व तो विशेष स्तुत्य आहे असें वाटतें; याचें कारण, इतिहास अगर कोणताहि विषय असो तो पद्यरूपानें जसा आबालवृद्धांच्या स्मरणांत अहोरात्र खेळत असतो तसा गद्यरूपानें राहत नाहीं; ह्मणून आपल्या राज्यकर्त्यांच्या गुणानुवादांचें ज्ञान लहानमुलांस बाल्यावस्थेपासूनच होत जावें या हेतूनें मराठी शाळांतील मुलांस व मुलींस इतिहास विषयांत ज्याप्रमाणें गायकवाडी राज्याचा इतिहास शिकविण्यांत येतो त्याप्रमाणें सर्व शाळांतून साहित्य व गायन या विषयांत अशा पद्यावलीचा उपयोग केल्यास सर्वांचें चित्तरंजन होऊन त्यास बोधही होईल.

६. **श्री. स. सयाजीराव महाराजसाहेब गायकवाड** यांची धवलकीर्ती काशीपासून रामेश्वरापावेतोंच काय, तर ती दूर देशांतही सुप्रसिद्ध आहे. यासाठीं अशा भाग्यशाली नृपवराचें पद्यरूपानें वर्णन केलेलें सुयश आबालवृद्धांनीं अहोरात्र गावें व श्रीपरमेश्वराजवळ महाराजांचें अभीष्टचिंतन करून त्यांस दीर्घायुष्य चिंतावें हेंच उचित होय.

ता. १-१२-१९२१

(सही) **कृष्णराव विनायक शार्ङ्गपाणी,**
बडोदे राज्याचे माजी नायब दिवाण व
वरीष्ट न्यायाधिशीचे न्यायाधीश.

७००६

श्री.

# अनुक्रमणिका.

पद्याचा क्रमांक. विषय. पृष्ठ.

अ. राजदंपतीच्या ठायीं वरदहस्ता अशा श्रीलक्ष्मी व सरस्वती यांचा एकत्रवास (चित्ताकर्षक चित्रें) आणि तत्संबंधांत गुणवर्णनाचीं दोन पद्यें. १

१ मंगलाचरण .... .... .... .... १

२ नंदाजी मंत्रे (मूळ पुरुष) यांच्या वंशजांपैकीं प्रतापराव गायकवाड यांचेपासून श्री. स. महाराजसाहेब यांचें अवतरण व त्यासंबंधांत कारणापुरता वंशवृक्ष. .... ... ... ... १, २

३ भगवान श्रीगोपाळकृष्ण यांच्याशीं श्री. सरकार यांची तुलना. ... ... .... .... ३

४ गायकवाड या आडनांवाची उत्पत्ति. .... .... ३

५ श्री. सरकार यांचें मूळगांव आणि त्यांचे वडील व मातुश्री याविषयीं .... ... .... ४

६ मातुश्री उमाबाई यांचे डोहाळे .... .... ४

| पद्याचा क्रमांक. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ७ | श्री. स. **महाराजसाहेब** यांचें जन्म .... | ५ |
| ८ | श्रीमंतांची जन्मकुंडली. .... .... .... | ५ |
| ९-१० | जन्मकुंडलीचें संक्षिप्त वर्णन. .... .... | ६ |
| ११ | जन्मवेळा. ... .... .... .... | ७ |
| १२ | बालनृपाचें तेज व ज्योतीष्यांचें भविष्यकथन. .... | ७ |
| १३-१४ | वडील व मातुश्री यांचा आनंद व पुत्रमहोत्सव. | ७ |
| १५ | बालक्रीडा. .... .... .... .... | ८ |
| १६ ते १८ | कौमार्यावस्थेचे खेळ. .... .... | ८ |
| १९ ते २१ | लहान वयांत भावी उत्कर्षाचें पडत असलेलें स्वप्न. .... .... .... .... | ८,९ |
| २२ | श्री. खंडेराव महाराज यांनीं जें यश संपादन केलें तें श्री स. **महाराजसाहेब** यांनीं वाढविलें त्याविषयीं. .... ... .... | ९ |
| २३ | श्री.मल्हारराव महाराज यांजकडून दत्तकाची योजना करण्यासाठीं कवलाणेंकर श्री. काशीराव गायकवाड यांस बोलावणें. .... ... .... | १० |
| २४ | श्री. काशीराव गायकवाड यांस मिळालेलें आश्वासन व त्याबद्दल बहुमान मिळाल्याविषयीं..... .... | ११ |
| २५ | श्री. काशीराव गायकवाड हे परत आपल्या गांवीं गेले त्याविषयीं. ... .... .... .... | १२ |

| पत्र्याचा क्रमांक. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| २६ | श्री. मल्हारराव महाराजांचें पदच्युत होणें व गुर्जराधिपती कोण नेमावा अशाविषयीं प्रश्न निघाला त्याबद्दल. ... ... .... .... | १२ |
| २७ | नामदार इंग्रज सरकार यांच्या सुविचाराविषयीं. .... | १२ |
| २८ | श्री. मा. जमनाबाई महाराणीसाहेबांस, दत्तकाची निवड करून दत्तक घेण्यास पूर्ण अधिकार मिळाला त्याबद्दल. ... .... ... | १३ |
| २९ | राजा सर टि. माधवराव यांचें आगमन व त्यांनीं केलेली सुव्यवस्था. ... .... .... | १३ |
| ३० | श्री. मा. जमनाबाई महाराणीसाहेब यांची चिंता व योग्य विचार करून त्यांनीं आपली इच्छा सर टी. माधवरावास कळविली त्याबद्दल. .... .... | १४ |
| ३१ | पुत्रत्रयांचें वीरक्षेत्रीं आगमन व मातुश्रीचे चरणकमलाप्रत त्यांचें अभिवंदन. .... .... | १५ |
| ३२ | मधला पुत्र चि. गोपाळराव यांसच मातुश्रीनें दत्तक घेण्याचें योजिलें त्याबद्दल. .... ... | १५ |
| ३३ | बंधुत्रयांत श्री. स. महाराजसाहेबांसच राज्यासनासाठीं पसंत केलें त्याविषयीं. ... .... | १६ |
| ३४ | श्री स. महाराजसाहेब यांचें दत्ताविधान व राज्यपदारोहण यांचें संक्षिप्तवर्णन.... .... .... | १७ |


| ध्याचा क्रमांक. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ३५ | दत्तविधानाची मिति व कवीची सदिच्छा ... | १८ |
| ३६ | श्री. स. महाराजसाहेब यांहीं आपल्या गुणांनीं मातुश्रीला पुष्कळ सुख दिलें आणि बालभूपतीचें तेज याविषयीं. .... .... ... | १८ |
| ३७ | नामदार प्रिन्सॉफ्वेल्स यांचें श्रीमंतांस बहुमानपूर्वक मुंबईस पाचारण. .... ... .... | १९ |
| ३८ | नामदारांनीं श्रीमंतांस कुशल वगैरे प्रश्न विचारले त्यांचीं उत्तरें ऐकून नामदारांचा महदानंद. .... | १९ |
| ३९ | नामदारांचे श्रीमंताविषयीं उद्गार .... .... | १९ |
| ४० | श्रीमंतांचा नामजयघोष .... ... .... | २० |
| ४१ | श्रीमंतांचा अल्पवयांत बुद्धिप्रभाव. ... ... | २० |
| ४२ | श्रीमंतांच्या रमणीय मूर्तीवर स्पष्ट दिसत असलेलीं प्रसादचिह्नें. ... .... .... .... | २१ |
| ४३ | मे. इलियट् यांची राजाध्यापकाच्या जागीं नेमणूक. | २२ |
| ४४ | नामदार सर टि. माधवराव हे नृपाला राजनीति शिकवितात. .... ... ... .... | २२ |
| ४५ | मे. काजीशाबुद्दीन, मे. पेस्तंजी, मे. कीर्तने व मे. करसेटजी यांची शिक्षणार्थ नेमणूक. ... .... | २३ |
| ४६ | न्याय, हिशेबी, मुलकी अशा राजकीय विषयांचें शिक्षण. | २३ |
| ४७ | श्रीमंतांचे खास आवडते विषय तत्वज्ञान, अध्यात्मविद्या वगैरे. ... .... ... .... | २३ |

| पद्याचा क्रमांक. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ४८ | राजपुत्रविद्यालयांतील शिक्षणाविषयीं. .... | २४ |
| ४९ | अश्वारोहण, मृगया, वगैरे संबंधांत श्रीमंतांचें नैपुण्य. | २४ |
| ५० | करमणुकींसाठीं नानाप्रकारचे खेळ; शारीरिक व्यायाम; दैव व पौरुष यांची अनुकूळता. .... .... | २५ |
| ५१ | लक्ष्मी व सरस्वती यांचा श्रीमंतांचे ठायीं एकत्रवास. नामदार प्रिन्सॉफ् वेल्स यांचा बडोद्यास येण्याचा विचार. प्रजानिष्ठ राजा व राजनिष्ठ प्रजा यांच्या सुयोगाचें फळ राष्ट्रोन्नति.... .... .... | २६ |
| ५२ | नामदार प्रिन्सॉफ्वेल्स यांचें बडोद्यास आगमन. .... | २६ |
| ५३ | श्रीमंतांचे सद्गुण, सद्वर्तन वगैरे पाहून नामदारांचा संतोष. ... .... .... .... | २७ |
| ५४ | नामदारांचे बोधपर प्रेमोद्गार. .... .... | २७ |
| ५५ | नामदार स्वदेशीं गेल्यानंतर स्वतःच्या मातुश्री-सन्निध श्रीमंताची स्तुति त्यांनीं केली.... .... | २८ |
| ५६ | श्रीमंतांच्या मुखावरील यौवनतेज. मुलींचे बाप आपापल्या मुलींच्या लग्नासाठीं श्रीमंताविषयीं विचार करतात. रूप, गुण व धन यांहीं संपन्न अशा अनेक मुली पाहून श्रीमंतांची उडालेली धांदल. .... | २८ |
| ५७ | वधू पसंत करण्यांत धनापेक्षां गुणांलाच अधिक मान मिळतो. .... .... .... .... | २९ |
| ५८ | रूपापेक्षां गुणाचीच किंमत जास्त अशाविषयीं सिद्धांत व उदाहरणें. ... .... .... | २९ |

| पद्याचा क्रमांक. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| ५९ | अखेर तंजावरचीच रूपगुणसंपन्न अशी वधू पसंत ठरून तिथीनिश्चय, वरपूजा, वाग्दान वगैरे होतात. | २९ |
| ६० | लग्नाला जातांना श्रीमंतांना मातुश्रीकडून मिळालेला आशीर्वाद. .... .... .... .... | ३० |
| ६१ | श्रीमंत सरकार लग्नाला जाण्यासाठीं ऐरावत नांवाच्या हत्तीवर आरूढ होतात. ... .... | ३० |
| ६२ | लग्नाच्या मंगलाष्टकांपैकीं एक श्लोक. .... .... | ३० |
| ६३ | तंजावरचे दैवतराव चव्हाण मोहिते यांच्या कन्येशीं शरीरसंबंध घडला त्याबद्दल. .... .... | ३१ |
| ६४ | श्रीमंतांच्या प्रथम विवाहाची मिति. प्रजेचा आनंद | ३१ |
| ६५ | श्रीमंतांची योग्यता. राज्यारोहणासाठीं मुहूर्त ठरतो. | ३२ |
| ६६ | नामदार फरग्यूसनसाहेबांच्या विद्यमानें श्रीमंतांचें राज्यारोहण. .... .... ... .... | ३२ |
| ६७ | राज्यारोहणाचा खरा महदानंद व अपूर्व महोत्सवाची योग्यता. .... .... ... .... | ३३ |
| ६८ | राज्यारोहणानंतर प्रजाजनांस देण्यांत आलेलें अभयपत्र व त्याविषयीं उद्गार. ... .... .... | ३४ |
| ६९ | मिळालेल्या अभयपत्राप्रीत्यर्थ प्रजाजनांकडून श्रीमंतांचें अभिनंदन व प्रजेचे उद्गार. .... .... | ३४ |
| ७० | राज्यारोहणाची मिति. .... .... ... | ३५ |
| ७१ | प्रजाजनांकडून श्रीमंतांचें अभीष्टचिंतन. .... | ३५, ३६ |

২৭৫২

श्री.




॥ राजदंपती असो चिरायु विनवूं शिवचरणीं ॥

# राजदंपतीगुणवर्णन.

## पद्य १.

राग बरूवा. ता. धुमाळी.

( " नृपममता रामावरती " ही चाल. )

॥ निजदेशहितास्तव झटसी ॥ विश्रान्ती कधिंहि न घेसी ॥
॥ नृपवरा ॥
॥ विद्याधनदाना करिसी ॥ द्विज अंत्यज नच तैं म्हणसी ॥
॥ नृपवरा ॥
॥ ठेवोनी समदृष्टीसी ॥ सकलांना वश करितोसी ॥ नृपवरा ॥
( चाल ) ॥ विसरुनि ॥ वैर तें मनीं ॥ तुजसि पाहुनि ॥
॥ शारदा मानी ॥
( चाल ) ॥ लक्ष्मीसी प्रियकर सखिशी ॥ नृपवरा ॥ १ ॥

## पद्य २.

( " स्वार्थी जी प्रीति मनुजाची सहज ती " ही चाल. )

॥ राज्ञी ही राज्यविभवाची स्वामिनी ॥ ध्रु० ॥
॥ अवनीतलसौभाग्य–अलंकृतसदयलोकजननी ॥
॥ पुत्रपौत्रधनाविद्याविनयें सुगुणभूपरमणी ॥
॥ विविधदेशजनरीतिविलोकुनि चतुरराजगृहिणी ॥
॥ राजदंपती असो चिरायू विनवूं शिवचरणीं ॥
॥ राज्ञी० ॥ २ ॥

## ॥ श्रीवाग्देवी ॥



॥ शुक्लां ब्रह्मविचारसारपरमामाद्यां जगद्व्यापिनीम् ॥
॥ वीणापुस्तकधारिणीमभयदां जाड्यान्धकारापहाम् ॥
॥ हस्ते स्फाटिकमालिकां विदधतीं पद्मासने संस्थिताम् ॥
॥ वन्दे तां परमेश्वरीं भगवतीं बुद्धिप्रदां शारदाम् ॥१॥

॥ श्रीसांब प्रसन्न. ॥

# श्रीसयाजीवृत्तरत्नमंजूषा काव्य.

## ( संगीत. )

## ( बाल्यचरित्र. )

### मंगलाचरण.

### शार्दूलविक्रीडित.

॥ भावें [1]पुण्यपदारविंदयुगुला मी प्रार्थितो [2]भारती ॥
॥ [3]वागर्थानुभवार्थ देवु मजला सद्बुद्धि काव्यामृतीं ॥
॥ [4]पुण्यश्लोकनृपाग्रणींत विलसे जो [5]आद्यपीठीं सदा ॥
॥ [6]तच्चारित्र निवेदवो कविमुखें बुद्धिप्रदा शारदा ॥ १ ॥

१. पवित्र चरणकमलद्वयाला, २. हे सरस्वती. ३. वाणीच्या अर्थाचा अनुभव घेण्यासाठीं. ४. ज्यांच्या पवित्र नामाची लोक कीर्ती गातात अशा राजांच्या पुढाऱ्यांत. ५. श्रेष्ठस्थानीं. ६. त्याचें चरित्र.

### ( २ ) चामर.

॥ [1]नंदवंशजात जो [2]प्रताप वीर भूपती ॥
॥ [3]तत्परप्रपौत्रपुत्र जो **सयाजि** गीष्पती[4] ॥
॥ पुत्रपौत्र[5]सत्कलत्र[6]मित्रवान्[7]सुवृत्त हा ॥
॥ सच्चारित्रपात्र [8]सज्जनातपत्र इंद्र[9] हा १ ॥

१. नंदाजीमंत्रे यांचे वंशांत उत्पन्न झालेला. २. प्रतापराव गायकवाड (वंशवृक्ष पहा ). ३. प्रतापराव गायकवाडाच्या निपणतूचा मुलगा गोपाळराव. ४. वाणीचा अधिपति=बृहस्पति. ५. चांगली पत्नी. ६. पुष्कळ मित्र आहेत असा. ७. चांगलें आहे चरित्र ज्याचें. ८. सज्जनांचें छत्र ९. राजा.

( " बडोद्याचे राज्यकर्ते " या पुस्तकांतून ( पान ४१४ )

( कारणीक उतारा )

नंदाजी. ( मूळपुरूष )
|
केरोजीराव.
|
दमाजी.
|
पिलाजी.
|
- प्रतापराव
  |
  काळोजी.
  |
  गवाजी.
  |
  भिकाजी.
  |
  काशीराव.
  |
  **गोपाळराव** ( दत्तक. हल्लींचे श्री. सयाजीराव महाराज सा.)
- दामाजीराव.
  |
  गोविंदराव.
  |
  सयाजीराव.
  |
  खंडेराव——मल्हारराव ( पदच्यूत )
  |
  **श्री सयाजीराव** (दत्तक.)

## ( ३ ) दिंडी

( राग लीलांबरी–ताल दादरा. )

॥ नंदनंदन[१] आनंदकंद[२] दाता ॥
॥ गोकुलाधिप गोपालपाल[३] नेता[४] ॥
॥ जन्मनामें गोपाल सयाजी[५] हा ॥
॥ नंदवंशांताचि[६] धन्य धन्य पाहा ॥ १ ॥

१. नंदाचा पुत्र. २. आनंदाचें मंडळ (समूह). ३. गोपाळांचा पालन-कर्ता. ४ पुढारी. ५. सु+याजी=सुयाजी=चांगलें यज्ञयागादिकर्म करणारा=सयाजी ६. नंदाजीमंत्र्यांच्या वंशांत.

## ( ४ ) स्रग्धरा.

*नंदाजीरावमंत्रे चतुर बहुगुणी गोद्विजासक्त[१] नेता[२] ॥
ह्याणी जो त्या कसाया समरिं झगडुनी धेनु वृत्त्यर्थ[३] नेतां ॥
रक्षी गायी कवाडीं[४] म्हणुनि जन अशा बोलती भावनेनें ॥
तीं[५] ही गायीकवाडी चिर[६] सुखद वसो कामधेनूकृपेनें ॥ १॥

१. गायी ब्राह्मणांच्या ठिकाणीं दृढभक्ति ठेवणारा. २. पुढारी. ३. चरितार्थासाठीं. ४. महाद्वाराचे आंत. ५. गायी कवाडांत आणून त्यांचें रक्षण केल्यामुळें गायीकवाड अगर गायकवाड असें नांव सुप्रसिद्ध झालें. ६. पुष्कळ वर्षे. *पूर्वी पुणें जिल्ह्यांत पांच मावळांपैकीं पवनमावळ तालुक्याच्या

" **भरें** " या नांवाच्या गांवांत नंदाजीमंत्रे नांवाचे पाटील राहत होते. या गांवाच्या सभोंवतीं मोठा कोट असून त्याला महाद्वारेंही होतीं. एके दिवशीं कांहीं कसाई ( खाटकी ) कित्येक गायी घेऊन चरितार्थासाठीं जात होते; हें नंदाजीमंत्रे यांनीं कोटाच्या महाद्वारांतून पाहिलें आणि लागलींच त्या कसाबांचा पराभव करून सर्व गायी कोटाच्या कवाडांत घेतल्या आणि त्यांची पूजा करून त्यांचें रक्षण केलें. **गायी कवाडीं** घेतल्या तेव्हां पासून **गायीकवाड** अगर **गायकवाड** हें आडनांव त्या घराण्यांत चालू झालें तें अद्याप चालत आहे.

## ( ५ ) साकी.

॥ गायकवाडांचें कवलाणें[१] जन्मभूमि रायाची[२] ॥
॥ काशिराव यत्पिता सुमाता उमा मूर्ति शांतीची ॥
॥ झाले धन्य जगीं ॥ प्रसवुनि पुत्र राजयोगी[३] ॥ १ ॥

१. खानदेश जिल्ह्यांत हें खेडेगांव आहे. २. हल्लींचे श्री. स. सयाजीराव महाराजसाहेब. ३. ज्याचे जन्मकुंडलींत उत्तम राजयोग साधला आहे असा.

## ( ६ ) आर्या.

॥ दोहदवती[१] उमाई कुलभूषा[२] काशिराव वामा[३] ती ॥
॥ भूपप्रसवा[४] कारण उत्कट रुच्यर्थ घेइ कां माती[५] ॥ १ ॥

१. द्विहृदय=दौर्हृद=दोहद=डोहाळे=डोहाळे होत असलेली. २. कुळाला शोभविणारी. ३. पत्नि. ४. राजाचें जन्म. ५. ( कै. मा. उमाबाईला मुखमार्जनाच्यावेळीं काळी माती खाण्याचे डोहाळे लागले होते असें कै. हि. बा. आनंदरावदादा गायकवाड ( हल्लींचे श्री. स. महाराजसाहेब यांचे वडील बंधु ) यांनीं कळविलें. ( हे डोहाळे लागण्याचें कारण भूपाला प्रसवण्यासाठींच होतें किंवा काय ? )

## (७) स्वागता.


(राग छाया. ता. च. जा. तेताला मा. १६ मध्यकाल)

॥ मासपूर्ण भरतां जननीला[1] ॥
॥ जन्मला नृपमणी[2] अवनीला[3] ॥
॥ जाणतां वदति सज्जन वाचें ॥
॥ स्वागता[4] शुभ सदा नृपतीचें ॥ १ ॥

१. कै. मा. उमाबाईला. २. हल्लींचे श्री. स. सयाजीराव महाराजसाहेब. ३. वसुंधरेला. पृथ्वीला. ४. राजाच्या अभिनंदनार्थ मंगलवचनें.

### * जन्मकुंडली.

संवत १९१९ शके १७८४ फाल्गुन कृष्ण ५ घ. २३ प. ५९ सहषष्ठी भौमवार विशाखानक्षत्र घ. ४७ प. ४८ व्याघात घ. १५ प. १५ श्रीसूर्योदयाद्गतघटी ४९ प. १. ता. ११ मार्च इ स. १८६३ उत्तररात्र १ वाजून ५७ मिनिटें खानदेश स्थानिकवेळा (लोकल टाईम.).




* ही कुंडली श्रीयुत दाजी नागेश आपटे, R. A. L. L. B. हायकोर्ट वकील यांनी स्वतःच्या कुंडलीसंग्रहावरून तपासून दिली.

## ( ८ ) पद्य.

( राग शंकराभरण ताल दादरा ).

॥ फाल्गुनांत श्री सयाजि भूप जन्मला ॥
॥ गुर्जरभूभाग्यसूर्य उदय पावला ॥ ध्रु० ॥

॥ कृष्णपंचमीसहषष्ठी[१] शुभप्रदा ॥
॥ शुभनक्षत्रविशाखा टाळि आपदा ॥

॥ भौमवार निशिवेळा इष्ट सिद्धिदा[२] ॥
॥ भौम साहवाहि देइ राज्यसंपदा ॥
॥ [३]लग्नेशैकादशस्थ सत्य लाभला ॥
॥ फाल्गुनांत श्रीसयाजि० ॥ १ ॥

१. मंगलदायक. २. सिद्धिदेणारी. ३. लग्नस्वामी ११ वा.

## ( ९ ) आर्या.

॥ धनलग्न कुं[१]भिबुधरवि[२] भार्गवउच्चस्थ भौमवृषभेचा ॥
॥ उच्चाभिलषी [३]रविसुत राज्यप्रद सुरगुरूहि तूळेचा ॥ १ ॥

## ( १० ) आर्या.

॥ [४]रजनीश वृश्चिकेचा राहूशीं [५]द्वादशस्थ मध्यम हा ॥
॥ शनिशुक्र मित्रभावें भौमहि करि सुखद राजभोग महा ॥ ॥

## ( ११ ) आर्या.

॥ सतराशे चौऱ्यांशी शक वत्सरदुंदुभींत जन्म भला ॥
॥ सूर्योदयाद्गतघटी एकुणपन्नास एकपळ वेळा ॥ १ ॥

१. कुंभराशींत. २. शुक्र. ३. शनी. ४. चंद्र. ५. संवत्सर.

## ( १२ ) स्रग्विणी.

॥ राजमूर्तिप्रभा मंदिरीं फाकली ॥
॥ राजयोगी सुचिन्हांकिता शोभली ॥
॥ " बाल होईल हा दिव्य लक्ष्मीपती ॥
॥ भूपतीही " असें ज्योतिषी भाकिती ॥ १ ॥

१. चांगल्या लक्षणांनीं युक्त. २. भविष्य वर्तवितात.

## (१३) (१४) अंजनी गीत.

( राग झिंझोटी ता. धुमाळी. )

॥ दैवज्ञांची मंगलवाणी ॥ जनकजननिही मग ऐकूनी ॥
॥ आनंदाश्रू येतां नयनीं ॥ मानिति धन्य जनीं ॥ १ ॥
॥ पुत्रोत्सव हा बालनृपाचा ॥ हर्षप्रद दिन नागरिकांचा ॥
॥ भावी सुदिनचि गुर्जरभूचा ॥ प्रेमें जन करिती ॥ २ ॥

१. ज्योतिषांची. २. आनंद देणारा.

## ( १५ ) द्रुतविलंबित.

( राग सोहनी. ता. च. जा. तेताला मा. १६ मध्यकाल ).

॥ धवलपक्षशरत्शशितेजसा ॥ सुरवरद्युति कीं शिशु तो जसा ॥
॥ जननि देइ तया बहु लालनीं ॥ हयगजादिक मृण्मय खेळणीं॥१॥

१. शुक्लपक्षांतल्या शरदृतूच्या चंद्राच्या तेजासारखा. २ देवांची कांती. ३. बाळ. ४. घोडे हत्ती वगैरे. ५. मातीचीं.

## ( १६-१७-१८ ) शुद्ध कामदा ( विबुधवंदिता )

( राग प्रदीपक. ता. च. जा. तेताला मा. १६ मध्यकाल )

॥ जमवि जो गृहीं, सारखीं मुलें ॥ प्रबळ संहती होइ त्यामुळें ॥
॥ मग ह्मणे तया, "मान्य कीं करा॥ अधिप या मला नित्य अनुसरा ।१।
॥ सतत जाउनी कृष्णमंदिरीं ॥ सकलही करूं ऐक्य अंतरीं ॥
॥ परिसुं भारता पावनी कथा ॥ स्फुरण ये मना सत्य नोन्यथा ॥२॥
॥ कसरती तशा प्रत्यहीं करूं ॥ जनपदीं सदा श्रेष्ठता वरूं ॥
॥ गोद्विजा स्मरा त्रिपुरसुंदरी" ॥ सदुपदेश हा बाल तो करी ॥३॥

१, ऐक्य. २. पवित्र. ३. न+अन्यथा. ४. वर्चस्व.

## ( १९-२०-२१ ) माणवक.

(राग काफी. ता. दीपचंदी अथवा सारंग. ता. जलद दादरा मा. ६ मध्यकाल )

॥ " स्वप्न पडे हें मजला ॥ भास असे कीं असला ॥
॥ दिव्यमणीन्द्रें महिला ॥ भूषविते नागकला ॥ १ ॥

॥ निद्रित मी गाढ निशीं ॥ नाग दिसे तो[४] मजसी ॥

॥ वेष्टुनि हा सर्व[५] गळा ॥ छत्र धरी या तनुला[६] " ॥ २ ॥

॥ पुत्र[७] सदा वृत्त[८] असें ॥ निज जनका[९] सांगतसे ॥

॥ मंगल[१०] हा योग[११] भला ॥ ज्ञानबळें[१२] त्या[१३] गमला ॥ ३ ॥

१. नागाच्या योगानें. २. पृथ्वीला. ३. नागाचें तेज. ४. तो नाग. ५. फणा. ६. शरीराला. ७. श्री. स. महाराजसाहेब. ८. हकीकत. ९. वडिलाला. १०. कल्याणदायक. ११. उत्तम. १२. ज्ञानदृष्टीनें. १३. वडिलाला.

## ( २२ ) पद्य.

( राग गौरी. ता. धुमाळी. " वीरशिरोमणी सकल धनुर्धर "...ही चाल )

॥ गुर्जरराष्ट्रीं गायकवाडी राज्यश्री[१] नांदते ॥

॥ लोकीं सुयश सदा जोडिते ॥

॥ अस्तंगत[२] जरी पुत्र तियेचे धन्य मान्य वीर ते ॥

॥ कीर्ती अजरामर[३] राहते ॥

॥ सत्कीर्तीची[४] धवलपताका लोकत्रयिं[५] फडकते ॥

॥ सुयशाचे सज्जनांस निववितें[६] ॥

(चाल) ॥ नृप खंडेरावें अखंड यश मिळविलें ॥
॥ तें सदैव गायकवाडकुळा लाभलें ॥
॥ गोद्विजप्रसादें वृद्धिंगत पावलें ॥
(चाल) ॥ ऐशा सत्कुळीं कुलदीपकसुत[७] माय उमा प्रसवते ॥
॥ पूर्वज[८]पुण्य अग्रिं[९] धांवते ॥ १ ॥

१. राज्यसंपदा. २. नांदीसे झाले. ३. कायम. अक्षय. ४. स्वच्छ; शुभ्र. ५. स्वर्ग, मृत्यु, व पाताल या तिन्ही लोकांत. ६. शांत करते; आनंद देते. ७. श्री. स. हल्लींचे सयाजीराव महाराजसाहेब. ८. वाडवडिलांचें. ९. पुढें पुढें.

## ( २३ ) *पद्य

(राग जंगला. ता. धुमाळी, "दोघि सवति भांडती पति भंगडगुंगा" ही चाल).

॥ भूपती असे तो महदाश्रय[१]सुखदाता ।
॥ मल्हाररावमहाराज गुणीजन[२]भोक्ता ॥ ध्रु० ॥
॥ ऐश्वर्यपूर्ण जरि वसे धैर्य बहु ममता ॥
॥ ना चुके कुणा महदशेंत फेरा फिरतां ॥
॥ ग्रासिलें पूर्ण गुडघी[३]नें ॥ नृपवरा[४] ॥
॥ दत्तकार्थ चिंता पडली ॥ नृपवरा ॥
॥ भरवसा तनूचा नव्हता ॥ नृपवरा

ग्रं. क्रमांक
१००६५

॥ दत्तकार्थ नृपती पुत्रयोजने करितां ॥
॥ आदरें आणवी कवलाणेकर आप्ता ॥ १ ॥

१. मोठा आधार व सुख यांना देणारा. २. गुणी लोकांना चाहणारास. ३. गुडघी नांवाचा रोग. ४. कै. मल्हारराव महाराज. ५. कवळाणें गांवचे राहणारे-* या पद्यांतील हकीकत कै. माधवराव तांबे यांनी फडनिशी दफ्तराच्या माहितीवरून दिली ती घेतली आहे.

## ( २४ ) विबुधप्रिया ( चर्चरी )

॥ काशिराव उमाधवें कवलाणवासि सुतत्रया ॥
॥ आणिले [1]वटपत्तनीं जणु [2]अत्रिच्या त्रयमूर्ति त्या ॥
॥ पुत्र सुंदर ते धुरंधर [3]कांतिमंडित पाहतां ॥
॥ रोगपीडित [4]राय तो मनिं तुष्ट देइ [5]सुमान्यता[*] ॥ १ ॥

१. बडोद्यास. २. अत्रीऋषीच्या. ३. तेजस्वी. ४. मल्हारराव महाराज. ५. उत्तम संमति.*यावेळीं काशिराव गायकवाड यांना शेलापागोटें बहुमान ह्मणून देण्यांत येऊन "याबद्दल विचार करून कळवूं" असें श्री. मल्हारराव महाराजांनीं कळविलें. संवत १९२८ सालीं या संबंधांत रु. ( १९१ ) खर्च पडल्याबद्दल व त्यावेळीं श्री. उखाजीराव गायकवाड त्यांचे चिरंजीवासहित हाजर होते असें कै. माधवराव तांबे यांनी फडणीस दफ्तराच्या आधारें कळविलें.

## ( २५ ) साकी.

॥ गुर्जरभूची[1] भावि[2] सौख्यसुमुहूर्तमेढ[3] रोवोनी ॥
॥ स्वग्रामीं पुत्रा सह गेले काशिराव परतोनी ॥
॥ विजयी सुत[4] ऐसा ॥ नांदो भूवरिं या रविसा[5] ॥ १ ॥

१. गुजराथ देशाची. २. भविष्यकाळची. ३. सुखाची सुमुहूर्तमेढ (चांगल्या मुहूर्तावर रोविलेला जयस्तंभ.) ४ हल्लींचे श्री स. सयाजीराव महाराज साहेब. ५. सूर्याप्रमाणें.

## ( २६ ) आर्या.

॥ दुर्दैवानें मल्हाररावाचा भाग्यसूर्य मावळला[1] ॥
प्रश्न निघे मग ऐसा नेमावा गुर्जरेश[2] कोण भला[3] ॥ १ ॥

१. ( पदच्यूत झाले ). २. गुजराथ देशाचा अधिपति. ३. चांगला योग्य.

## ( २७ ) उमा ( मदिरा )

॥ श्रीमदखंडसुमंडलमंडित[1] आंग्लनृपेन्द्र[2] विचार करी ॥
॥ न्यायसुनीतिविशारदकोविद[3] शीघ्र[4] नियोजिति वीरपुरीं[5] ॥
॥ ते गुणदोष विवेचुनि सोज्वळ[6] निर्णय साग्र[7] रुजू करिती ॥
॥ दत्तक योजुनि राज्य सुयंत्रित[8] चालविणें बरवें[9] म्हणती ॥ १ ॥

१. ( संपत्ति व विद्याविनयादि गुणांनीं युक्त अशी मंडळी ज्यांचे तैनातींत आहे असे ). २. नामदार इंग्रज सरकार. ३. न्याय व सुनीति या शास्त्रांत प्रवीण अशी अनुभवी विद्वान् मंडळी. ४. तावडतोब; सत्वर. ५. बडोदें राजधानींत. ६. स्वच्छ; प्रांजलबुद्धीचा. ७. विस्तृत. ८. चांगल्या घटनेनें. ९. योग्य; चांगलें.

## ( २८ ) पद्य.

### राग बिलावल ता. त्रिवट.

(" प्रतीकूल होईल कैसा कृष्णदेव माते " ही चाल. )

॥ सदा स्थिती जरि कवणाची सारखी न राहे ॥
॥ सत्य नित्य सत्परिणामी जयप्रद नरा हें ॥ ध्रु० ॥
॥ सत्यशील खंडरावें अढळ पाळियेलें ॥
॥ पुण्य तें अशा या समयीं सुखद फळा आलें ॥
॥ नामदार मुख्य नृपानें पूर्ण साह्य केलें ॥
॥ महाराज्ञि जमनाबाई तीस आदरीलें ॥
॥ दत्तकार्थ अधिकृत केलें श्रेय नृपवरा हें ॥ १ ॥
॥ सदा० ॥

१. बंडाचेवेळीं ना. इंग्रज सरकारास मदत केली तें. २ नामदार इंग्रज सरकार. ३. अधिकार दिला.

## ( २९ ) । पद्य ।

( राग पिलु, ता. धुमाळी "आजि अक्रुरहा" ही चाल. )

॥ नयनीतिसुधी सर टी माधवराया ॥
॥ आणविलें वीरपुरीं या ॥ ध्रु० ॥
॥ ते घेति करीं नमुनि राज्ञिचरणाला ॥
॥ त्या राजकार्यसूत्राला ॥
॥ बहु तोषविलें स्मरुनि न्यायनीतिला ॥

॥ गुर्जरभूप्रजाजनाला ॥
॥ श्रीयुत सर टी माधव मान्य जनाला ॥
॥ पात्रं ते अमर सुयशाला ॥
( चा. ) ॥ गायीकवाडि राज्याचें ॥ सिंहासन भूषित साचें ॥
॥ करवाया अवन[2] जनांचें ॥
( चा. ) ॥ ते विनवीती योग्य पुत्र निवडाया ॥
॥ राज्ञीस कृतार्थ[3] कराया ॥ १ ॥

१. चांगली आहे बुद्धि ज्यांची असे. २. पालन. ३. कृतकृत्य.

## (३०) पद्य.

( राग गौरी. ता. धुमाळी. " वसंतीं बघुनि मेनकेला " ही चाल. )

॥ माउली चिंतातुर झाली ॥
॥ उमाधवा[3] ध्यातसे भावही दृढ तत्पदकमलीं ॥
॥ व्यग्रता मानसिं उद्भवली ॥
॥ राज्यभरें तिज कधीं सुखानें निद्रा नच आली ॥
॥ राज्यासना भाग्यशाली ॥
॥ सुशील सुकृतिही[3] अल्पवयिच सुत मातृवचन पाळी ॥
॥ योजना उदात्त[3] ही केली ॥
॥ त्रिगुणात्मक ती उमाधवात्मज मूर्ती आठवली ॥
॥ चिंता कांहींशी निवली ॥
॥ राजे सर टी माधवराया स्वेच्छा कळविली ॥

॥ पूजिला सांबचंद्रमौली ॥
॥ प्रसन्न होउनी उमाधवें ही सद्बुद्धी दिधली ॥ १ ॥

१. मा. जमनाबाई ( राज्यामनासाठीं दत्तकाची निवड करण्याची जबाबदारी स्वतःवर आल्यामुळें मातुश्री अहोरात्र चिंताग्रस्त झाली. ). २. पार्वतीपती श्रीशंकर अथवा मा. उमाबाईचा पती काशिराव गायकवाड. ३. सत्कर्म आचरणारा. ४. दूरदर्शीपणाची. ५ काशिराव गायकवाड यांचा पुत्र. ६. दूर झाली.

## ( ३१ ) साकी.

॥ माधवरायें उमाधवाते आणविलें सन्मानें ॥
॥ तत्सुतरत्नत्रय दावियले राज्ञीला प्रेमानें ॥
॥ नमिती मातृपदा ॥ सुत ते पावति योग्यपदा ॥ १ ॥

१. राजा सर टी. माधवराव यांनीं. २. काशिराव गायकवाडाला. ३ त्याचे तिघे पुत्र. ४. मा. जमनाबाईला. ५. मातेच्या चरणाला.

## ( ३२ ) पद्य.

( " शारदे दासकामंदे " ही चाल. )

॥ गुर्जरीं रम्य वैटपुरीं सैगुणनोवरी विवाहीं नटुनी ॥
॥ मानिते अतुल सुख निजवर पाणिग्रहणों ॥ ध्रु० ॥
॥ ठरविला योग्य वर खासा राज्ञिनें ॥
॥ जो तिघांत त्रिगुणात्मकसा निजगुणें ॥

॥ जयिं दिसे थोर *आकांक्षा धोरणें ॥

॥ जनपदा योग्य नृपपदा राज्यसंपदा मान्यवर सुजनीं ॥

॥ **गोपाल**नामसा होइल गुरु वाग्ज्ञानी ॥ १ ॥

१ गुजराथ देशांत २. बडोदें राजधानी. ३. सद्गुणी. ४ अनुपम, श्रेष्ठ. ५. सत्व, रज व तम या तिन्ही गुणांनीं युक्त अशा श्री विष्णूसारखा. ६. मोठी इच्छा. ( राजा होण्याची मोठी उमेद ). ७. राष्ट्राला; प्रजाजनाला. ८. राज्यसंपदेला मान्यवर. ९. सज्जनांत. १०. श्रीगोपालकृष्णासारखा. ११. बृहस्पती.

---

* थोर आकांक्षा=मोठी उमेद. ( दत्तकासाठीं मुलगा पसंत करतेवेळीं मा. जमनाबाई यांनीं तिघांना प्रश्न विचारलेः—" तुह्मीं येथें कां आलांत ? " त्याचे उत्तरांत आनंदराव म्हणालेः–" आमच्या वडिलांनीं आम्हांस या राजधानींत शाळेंत घालण्यासाठीं आणलें. " असाच जबाब श्री. संपतराव यांनींही दिला; आणि **गोपाळराव** म्हणाले–"मी येथें **राजा होण्यासाठीं आलो आहे**." ही थोर आकांक्षा पाहून सर्वांना आनंद झाला व पुढें यांनाच दत्तक घेण्याचें ठरविण्यांत आलें. ) ( ही हकीकत श्रीयुत गो. ना. उर्फ अण्णासाहेब दळवी व कै. आनंदराव गायकवाड यांनीं जात माहिती-वरून कळविली ).

## ( ३३ ) मंदारमाला.

॥ ज्येष्ठात्मजानंदरावा सुवाक्छंद शांती सुखानंद वंदी सदा ॥

॥ **गोपाल** भूपाल तेजोबळें बाल मानीच गोपालनीं संपदा ॥

॥ संपत्तिचा ईश नामें गणाधीश संपत्तरावास कीं बोलती ॥

॥ योजूनि भूपाळ सिंहासना बाळ **गोपाल** धीपाल सन्मानिती ॥१॥

१. वडील पुत्र आनंदराव गायकवाड. २. मधुरवाणी बोलण्याचा नाद. ३. गायींचें संरक्षण करण्यांत. ४. श्री. संपतराव यांचें जन्मनांव ( बडोद्याचे राज्यकर्ते पान ४१४ वंशवृक्ष पाहा ). ५. हल्लींचे श्री. सयाजीराव महाराज साहेब. ६. बुद्धिमान.

## ( ३४) पद्य

( " उगवो तो वैभवरवि पुनरपि या आर्यभूवरी " ही चाल ).

[ राग बिभास ताल दादरा ].

॥ सुखवो या राज्यपदारूढसुता श्रीउमापती ॥ धृ० ॥

॥ पुत्रवदन अवलोकुनि ॥ जननीचा हर्ष झुमनिं ॥
॥ मावेना अखिल गगनिं ॥ मानि धन्य ती ॥ १ ॥
॥ अंकावरि घेइ सुता ॥ कुरवंडुनि करि ममता ॥
॥ " बाळा हो सुखदाता ॥ तीव्र सन्मती " ॥ २ ॥
॥ नवनीतें माखियलें ॥ शिरकमला हुंगियले ॥ ॥
॥ राज्ञीनें आदरिले ॥ दत्तकाप्रती ॥ ३ ॥
॥ श्री **सयाजि** नाम भलें ॥ लाभप्रद ठेवियले ॥
॥ राजकुळा शोभविले ॥ धन्य भूपती ॥ ४ ॥
॥ गुर्जरभूभाग्यसूर्य ॥ श्रीश **नृपसंयाजि** आर्य ॥
॥ राज्यपदीं महत्कार्य ॥ कविहि वर्णिती ॥ ५ ॥

१. मा. महाराणी जमनाबाई यांचा. २. लोण्यानें.

## (३५) साकी.

॥ सतराशं सत्याण्णव शक सुखकर दिन वैशाखाचे ॥
॥ कृष्ण सप्तमी गुरुदिनिं झाले दत्तविधान नृपाचें ॥
॥ मंगल ईशकृपा ॥ लाभो आचंद्रार्क नृपा ॥ १ ॥

## (३६) पद्य.

(" बाळपणींचा काळ सुखाचा आठवतो घडिघडी " हे चाल)

॥ राजकुमारें[1] बहुत सुखविले स्वगुणें जननी[2]प्रती ॥
॥ अभिनंदनीय ही कृती ॥
॥ दत्तविधाना सत्परिणामी श्रेष्ठ हेंच ठरविती ॥
॥ इतिहासकार गी[3]ष्पती ॥
॥ कौमार्यतेज नृपतीचें ॥ सुख[4]निधान जें जननीचें
॥ दर्शन जणु पूर्ण शशीचें[5] ॥
॥ अरुणोदय हा गुर्जरभूवरि दिव्य बालभूपती ॥
॥ वंदनीय मंगलमूर्ती ॥ १ ॥

१. श्री स. सयाजीराव महाराजसाहेब यांहीं. २. मा. जमनाबाई यांना.
३. व्याख्याते. ४. सुखाचें स्थान. ५. चंद्राचें.

## ( ३७ ) पद्य.

"जो लोककल्याण, साधावया आण, घेई करीं प्राण, त्या सौख्य कैचें" ही चाल.

॥ राज्यासनापन्न, ऐश्वर्यसंपन्न, जो दिव्य भूरत्न, शोभे **सयाजी** ॥
॥ पाचारि भूपास[1], मुंबापुरीं खास, युवराज[2] सकलांस—आनंद आजी॥
॥भावी सुचिन्हास, प्रारंभ विजयास, बालार्कभूपास[1] युवराज[2] राजी ॥१॥

१. श्री. स. सयाजीराव महाराज साहेब. २. नामदार प्रिन्स ऑफ् वेल्स.

## ( ३८ ) पद्य.

( " ईशा चिंता निवारील सारी " ही चाल )

॥ श्रीश[1] युवराज[2] की तुष्ट साचा॥गुर्जराधिप सदा पाहुनी आमुचा॥ध्रु.॥
॥ बसवुनी जवळि त्या गुर्जरेशा ॥ प्रकट करि श्रीश युवराज तोषा॥
॥ नृप[3] वद मग अमृत घाल भाषा ॥
॥ हर्षे गगनीं न मावे विजयमूर्तिचा ॥ १ ॥

१. ज्याचे जवळ श्री=संपत्ति आहे असा. २. प्रिन्स ऑफ् वेल्स.
३. श्री. स. सयाजीराव महाराज साहेब.

## ( ३९ ) पद्य.

( राग सारंग ताल धुमाळी ' बाळा जो जो रे " ह्या पाळण्याची चाल. )

॥ जो गुणिजन भोक्ता । सुखदाता । प्रिन्सॉफ् वेल्स ज्ञाता ॥
॥ बोले ' जयशीला । या महिला । भूषण बालनृपाला[1] ॥

॥ [2]संस्कृत तव वाणी । गुण खाणी । येतां मम सुश्रवणीं ॥
॥ वदतो सत्यच मी । यमनियमीं । निजजन रक्षण कामीं ।
॥ होशिल तूं विजयी । बहु विनयी । सन्मति सुकृती न्यायी ॥
॥ द्वादश वर्षांचें । वय साचें । खचित जनकजननीचे ॥
॥ फेडिशि पांग मुला । राजकुला । मुकुटमणिच निवडीला ।
॥ तुजला मी आजी । जन राजी । राहो सुखवो प्रभुजी ॥ १ ॥

१. श्री. स. सयाजीराव महाराजसाहेब. २. ज्या वाणीला उत्तम संस्कार झाला आहे अशी.

## ( ४० ) पंचचामर.

॥ न मावळे सहस्ररश्मि सर्व आंग्लभूतलीं ॥
॥ असा अजिंक्य राजपुत्र बोलतांच त्या स्थलीं ॥
॥ "**सयाजिराव धन्य धन्य**" नामघोष जाहला ॥
॥ प्रसाद हा अलभ्य कीं सदा नृपास लाभला ॥ १ ॥

१. सूर्य. २. प्रिन्स ऑफ वेल्स. ३. श्री. स.सयाजीराव महाराजसाहेब.

## ( ४१ ) वसंततिलका.

॥ [1]एकोनविंशति वयांतच [2]ज्ञानराजें ॥
॥ ज्ञानेश्वरी रचिलि भूषण कीं नरा जें ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय १७५२

॥ तैसा **सयाजिनृप** अल्प वयांत दावी ॥

॥ बुद्धिप्रभाव [3]जयसूचिच ही वदावी ॥ ६ ॥

१. एकुणवीस ( १९ ). २. ज्ञानदेव. ३. भावी विजयाचें पूर्व चिन्ह.

## ( ४२ ) पद्य.

(" जो भेद विधीनें स्त्रीपुरुषीं केला " ही चाल ).

॥ **श्रीमंत सयाजी** पुण्यश्लोक नृपाची ॥

॥ सन्मूर्ति पहा हो [१]कौमार्यावस्थेची ॥

॥ श्रीविद्याविनयें भूषित [२]वाक्तेजाची ॥

॥ जणु मूर्ति मनोहर दाशरथी रामाची ॥

॥ ती [3]कुशाग्रबुद्धी दृष्टिहि मार्मिकतेची ॥

॥ बहु सोज्वळ दिसते [४]दीप्तिच भाग्यरवीची ॥

॥ शुभदायकाक्षरें भाळीं विधिलेखाचीं ॥

॥ तीं सत्य सुचविती वृद्धी परमसुखाची ॥

॥ वय लहान असो परि अतुल दिव्य शक्तीची ॥

॥ [५]प्रेरणा होतसे प्रगति महत्कार्याची ॥ १ ॥

१. बालपणची. २. वाणीच्या प्रकाशाची. ३ तीक्ष्णबुद्धि. ४. प्रकाश.
५. उपक्रम; वृद्धि.

## ( ४३ ) पद्य.

( " कधिं करिशी लग्न माझें तुज ठावे ईश्वरा " ही चाल ).

॥ पाहुनिया नृपवराच्या सुमतीचीं लक्षणें ॥
॥ निवडुनी माधवें[1] मनीं ॥ चतुर सद्गुणी ॥ श्रेष्ठ बुधजनीं ॥
ज्ञानदृष्टीनें ॥ १ ॥
॥ गुरु *इलियट एकचि असा ॥ भूपमानसा ॥ ज्ञानसूर्यसा ॥
सकल विद्येनें ॥ २ ॥
॥ राजाध्यापक योजिती ॥ तया नेमिती ॥ सकल वंदिती ॥
योग्य सन्मानें ॥ ३ ॥

१. राजे सर टी. माधवराव. २ विद्वान् लोकांत. ३. राजगुरु.

---

* त्यावेळचे सातारा जिल्ह्याचे कलेक्टर मे. इलियट साहेब C.I E.

## ( ४४ ) द्रुतविलंबित.

॥ सर[1] टि. माधव नित्य सुबुद्धिनें ॥
॥ विनयशास्त्रसुनीतिसुशिक्षणें ॥
॥ करिति प्राज्ञ[2] नृपा[3] शिवभूपसा[4] ॥
॥ गुरुसमर्थकृपामहिमा असा ॥ १ ॥

१. राजे सर टी. माधवराव. K.C.S.I. २. मोठा बुद्धिवान्. ३. श्री. सयाजीराव महाराज साहेब. ४. शिवाजीराजा सारखा.

## ( ४५-४६ ) आर्या.

॥ काजी[1] कार्यधुरंधर पेस्तंजी[2] कीर्तने[3] असे ज्ञाते ॥
॥ करसेटजीहि[4] सन्मति. देति नृपा[5] विविधविषयशिक्षण ते॥१॥
॥ न्याय हिशेबी मुलकी इतर अशा राजकीय विषयांचें ॥
॥ शिक्षण देती बुधजन[6] वर्णिति गुणगण[7] सदैव नृपतीचे ॥२॥

१. खा. ब. काजीशाहबुद्दीन C. I. E. २. खा. ब. पेस्तंजी जहांगिरजी. C. I. E. ३. रा. ब. विनायक जनार्दन कीर्तने. ४. खा. ब. करसेठजी रुस्तमजी. ५. श्री. स. सयाजीराव महाराज साहेब. ६. विद्वान् लोक. ७. अगणित गुण.

## ( ४७ ) शार्दूलविक्रीडित.

॥ तत्वज्ञान[1] नृपा[2] सदा प्रिय बहू अध्यात्मविद्या[3] तशी ॥
॥ व्यासंगेंच[4] अशा उदात्त[5] धरिली वृत्ती नृपें राजसी[6] ॥
॥ अभ्यासें दृढ युक्तसिद्धविषयीं[7] नैपुण्य[8] संपादिलें ॥
॥ वक्तृत्व[9]श्रवणार्ह[10] सत्य हितही[11] ईशें महीपा[12] दिलें ॥१॥

१. तत्त्वशास्त्र. २. श्री. स. सयाजीराव महाराजांना. ३. वेदांतविषयक ज्ञान. ४. दृढाभ्यासानें. ५. उच्च अगर श्रेष्ठ प्रकारची. ६. राजाला शोभेल अशी थोरपणाची. ७. खऱ्या व शक्य अशा रीतीनें शाबीत झालेल्या विषयांत. ८. निष्णात; पटाइत. ९ बोलण्याची शैली ( शुद्ध वाणी ). १० ऐकण्यास योग्य. ११. उपयोगी; लाभदायक १२ राजाला. (श्री. स. महाराज सा. यांना).

## ( ४८ ) पद्य.

( " शशिकुल भूषण गुणवंता " ही चाल. )

॥ वाङ्मयविषयीं[१] नृप रमला ॥ सोडुनि, कलिमलविषयाला[२] ॥
॥ शंका येतां अध्ययनीं ॥ पृच्छा[३] करि गुरुपदिं नमुनी ॥
॥ निर्णय होतां तुष्टमनीं ॥ ध्यानीं अन्य विषय आणी ॥
॥ शिकवुनि दादोजी[४] गुरुनीं ॥ जेवी शिव[५] केला ज्ञानी ॥
॥ तेवी भूप **सयाजींनीं** ॥ धरिली गुरुवचनें स्वमनीं ॥
॥ राजपुत्रविद्यालयिं[६] जातां ॥ स्वाध्यायचि[७] गमला ॥१॥

१. साहित्याच्या विषयांत. २. कलियुगांतले मलीन विषय. ३. प्रश्न. ४. शिवाजी महाराजांचे शिक्षक दादोजी कोंडदेव. ५. शिवाजी महाराज. ६. प्रिन्सिस स्कूल. ७. नेहमींचें अध्ययन.

## ( ४९ ) पद्य.

( " वाटे सर्वथा मुक्त झालो " ही चाल. )

॥ अश्वारोहणीं[१] मोद[२] भूपा ॥ तृ० ॥
॥ **जीन घर जीन तख्ता**[३] स्मरुनि निज मनीं ॥
॥ क्षात्रकुळधर्मवर भरतभूपाग्रणी[४] ॥

॥ करुनि मृगया निपुण जो शरक्षेपणीं[5] ॥
॥ सकल वंदिति अशा विष्णुरूपा ॥ १ ॥ अश्वा० ॥

१. घोड्यावर बसण्यांत. २. आनंद. ३. श्री. स. गायकवाड यांचा हा मुद्रालेख होय; याचा अर्थः—जीन हेंच त्यांचें घर व जीन हेंच त्यांचें सिंहासन. ४. हिंदुस्थानांतील सर्व राजांचा पुढारी. ५. निशाण (तीर) मारण्यांत.

## ( ५० ) पद्य.

( “ अभाग्याच्या घरीं बावा कामधेनु आली ” ही चाल. )

॥ अध्ययनानंतर नृपतीनें चित्तहि रंजविलें ॥
॥ बुद्धिबळें सोंकट्या गंजिफा नानाविध[1] खेळे ॥ ध्रु० ॥
॥ शारीरिकशिक्षणपटु[2] भूपा[3] कसरति शिकवीती ॥
॥ युद्धकुशलसैनिकांग्लगुरुही[4] सिद्ध तया करिती ॥
॥ व्यायामादिक नियमें करि नृप अध्ययना अंतीं ॥
॥ पौरुषदैवांच्या[5] या युतिनें[6] सत्य तया वरिलें ॥१॥

१. निरनिराळ्या प्रकारचे. २. शरीरानें होणाऱ्या व्यायामाचें शिक्षण देण्यांत पटाइत ३. श्री. स. महाराज साहेब यांना. ४. लढाइच्या कामीं प्रवीण असे सेना नायक व इंग्रजी शिक्षक. ५. पुरुषार्थ व दैव ( प्रालब्ध ) यांच्या. ६. जोडीनें.

## ( ५१ ) पद्य.

( वसंतीं बघुनि मेनकेला "...ही चाल. )

॥ सरस्वति[1] लक्ष्मी[2] या युतिचा ॥
॥ अस्वाभाविक[3] एके ठायीं निवास दोघींचा ॥
॥ परि तो भाव मत्सराचा ॥
॥ विसरुनि वरिती आश्रय नित्यही **भूपसयाजीचा** ॥
॥ प्रभावचि हा नृपबुद्धीचा ॥
॥ प्रिन्स[4] पुनरपी पाहू ह्मणती भूप वटोदरिचा[5] ॥
॥ सुयोगचि कवि वदती साचा ॥
॥ प्रजानिष्ठनृप[6] राजनिष्ठजन[7] हा राष्ट्रोन्नतिचा[8] ॥ १ ॥

१. विद्या. २. संपत्ति. ३. जातिस्वाभावाविरुद्ध. ४. प्रिन्सॉफ् वेल्स. ५. वडोद्याचा. ६. प्रजेच्या कल्याणाविषयीं तत्पर. ७. राजाला पूज्य मानणारे. ८. राष्ट्राच्या उत्कर्षाचा.

## ( ५२ ) दिंडी.

॥ नगर श्रृंगारिति नागरीक सारे ॥
॥ विजयदुंदुभि[1] गर्जती टणत्कारें ॥
॥ ठायिं ठायीं मांगल्यसुमनमाला[2] ॥
॥ अर्पिती सादर प्रिन्सराजसाला[3] ॥ १ ॥

१. जयसूचक नगारे. २. कल्याणदायक पुष्पांचे हार. ३. नामदार प्रिन्सॉफ् वेल्स.

## ( ५३ ) पंचचामर.

॥ नृपा, कृपाप्रसादयुक्त पाहि राज्यसंपदा[१] ॥
॥ गुणप्रकर्षणें[२] प्रसन्न, टाळि सर्व आपदा ॥
॥ असा सयाजि गाजि[३] राजि भूपती निरीक्षुनी ॥
॥ सदैव वेल्सराजपुत्र तुष्ट जाहला मनीं ॥ १ ॥

१. राज्यलक्ष्मी. २. गुणांच्या वर्चस्वानें. ३. बहादुर.

## ( ५४ ) पद्य.

( राग बिहाग ताल दादरा. " लक्ष्मी सम चंचल या वारकामिनी " ही चाल )

॥ प्रेमभरें वेल्सराजपुत्र वदे तो ॥
॥ श्री सयाजि ! धन्य नृपा ! सत्य सांगतो ॥ ध्रु० ॥
॥ विद्याविनयादि गुणें ॥ निजवर्तन भूषविणें ॥
॥ जननीवच गुरुवचनें ॥ श्रद्धेनें अनुसरणें ॥
॥ प्रिय वदुनी शुद्धमनें । सत्यव्रत आचरणें ॥
॥ सन्मार्गे भाग्यरवी उदय पावतो ॥ १ ॥
॥ बहुत नृपति भरतभुवनिं ॥ त्यांत तूंच गुणखाणी ॥
॥ तव निष्ठा अवलोकुनि ॥ झालो मी तुष्ट मनीं ॥
॥ इच्छित तव शुभ चिंतुनि ॥ पूर्ण करिल लोकजननि ॥
॥ सत्यप्रिय नृपतिविजय सतत गाजतो ॥ २ ॥

## ( ५५ ) आर्या.

॥ मुम्बापुर[1] सोडुनि मग प्रिन्स[2] जई पातला निजस्थानीं ॥
॥ देवीस[3] ह्मणे माते। धन्य सखा गुर्जरेश[4] भूपमणी ॥ १ ॥

१. मुंबई. २. प्रिन्साफ् वेल्स. ३. विक्टोरिया महाराणी. ४. गुजराथ देशचा राजा.

### ( प्रथम विवाद )

## ( ५६ ) पद्य.

( राग कालंगडा ता. त्रिताल. " निजरूप इला मी दावु का " ही चाल. )

॥ नृपराजकलानिधिमुखकमलीं[1] ॥ यौवनदीप्तीखनि[2] वसली ॥ ध्रु० ॥
॥ मदनमनोरम रूपगुणांची, ख्याति दिगंतीं श्रुत झाली ॥ १ ॥
॥ बहुतवरार्थीजनमनिं[3] मूर्ती, गुर्जरपतिची कीं ठसली ॥ २ ॥
॥ सधन अधनही रूपगुणान्वित,[4] दुहितांची गर्दी जमली ॥ ३ ॥
॥ रूपगुणश्रीतुलनेनें[5] या, नृपतिवराची मति भुलली ॥ नृपराज० ॥४॥

१. राजाच्या चंद्रासारख्या मुखकमलाच्या ठायीं. २. तारुण्याच्या तेजाची खाण. ३. वरासाठीं गरजू अशा पुष्कळ लोकांच्या मनांत. ४. रूप व गुण यांहीं संपन्न. ५. रूप गुण व संपत्ति यांच्या तुलनेनें ( चढाओढीनें ).

## ( ५७ ) पृथ्वी.

॥ धनाहुनि गुणां जगीं अधिक थोरवी येतसे ॥
॥ सदैव नृपमानसीं उचित कल्पना ही वसे ॥
॥ अशिक्षितवधू विभूषणबळें जरी ओढिती ॥
॥ उदात्त नृपमानसा; तरीहि ना चळे सन्मती ॥

१. अलंकारांच्या बळानें. २. उदात्त=श्रेष्ठ.

## ( ५८ ) पद्य.

( " वाल ज्याचें त्यास तें " या चालीवर ).

॥ रूप, गुणा मानिले ॥ नृपतीनें ॥
॥ सुरयुवतीहुनि जरि सुंदर, रूप गुणा मानिले ॥ ध्रु० ॥
॥ कोकिलकूजित, रूप तियेचें ॥ पातिव्रत्यचि, रूप वधूचें ॥
॥ क्षमा, स्वरूपचि साधुजनांचें ॥ विद्या, रूपचि कुरुप नराचें ॥
॥ अनुभवसिद्धजनीं व्यापक तत्वचि हें ठरविलें ॥ १ ॥

१. देवांगनेपेक्षां. २ कोकिलेचा स्वर.

## ( ५९ ) पद्य.

( " श्रीमंत पतीची राणी "......या चालीवर ).

॥ तंजावरची गुणखाणी ॥ सत्कुलीन राजसबाला ॥
॥ प्रिय मंजु जियेची वाणी ॥ नैववधू उचित लग्नाला ॥

॥ रम्याकृति जणु इंद्राणी ॥ रुचली ती तरुण नृपाला ॥
॥ व्हावया नृपाची राणी ॥ तिथि योजिति मांगल्याला ॥
॥ पाहूनि सुमंगलवेळां ॥ जन निघती वरपूजेला ॥
॥ वाग्निश्चय सत्वर केला ॥
॥ नृपराज जोडुनी पाणी ॥ वंदिती कुलस्वामीला ॥ १ ॥

१. मधुर. २. नवीन; उपवर. ३. रमणीय अशा दुहेरी बांध्याची.
४ शुभ कार्याला.

## ( ६० ) अंजनी गीत.

॥ नृप, जननीच्या चरणीं नमितां ॥ आशिर्वचनें बोले माता ॥
॥ " मंगलकार्या यावें आतां ॥ बाळा ! हो विजयी " ॥ १ ॥

## ( ६१ ) दोहरा.

॥ अतिसुंदर शृंगारिले ॥ ऐरावत गजराज ॥
॥ अंबारिंत आरूढले ॥ धन्य **सयाजीराज** ॥ १ ॥

## ( ६२ ) शार्दूलविक्रीडित.

( मंगलाष्टकाची चाल ).

॥ गोप्ता[१] जो वरदी[२] सुधी[३] नरपती[४] धीश्रीसुसंपन्न[५]ही ॥
॥ गोरूपा[६] धनधान्यसर्वफलदा जो पाळितो ही मही ॥

॥ चार्वी शांत गुणज्ञही नववधू प्रेमें वरी सोज्ज्वला ॥
॥ ऐसा भूप **सयाजि** ईश सकलां कुर्यात्सदा मंगला[10] ॥२॥

१. रक्षण करणारा २. देवाकडून प्रसाद झाला आहे असा. ३. चांगल्याबुद्धीचा. ४. राजा. ५ वुद्धि व संपत्ति यांहीं युक्त. ६. गाईचें रूप धारण करणारी ७. सुंदर. ८. गुणाला जाणणारी. ९. स्वच्छ; निर्मळ. १० कल्याणातें.

## ( ६३ ) साकी.

॥ चव्हाण सत्कुलजात[1] मोहिते नाम सुकीर्तित[2] ज्यांचें ॥
॥ हैबतरावात्मजा[3] सुशीला रूपहि दिव्य तियेचें ॥
॥ तंजावरकर ते ॥ जोडिति राजकीय नातें ॥ १॥

१. चांगल्या कुळांत जन्मलेली. २. चांगल्या यशानें गाजलेलें ३. हैबतराव यांची कन्या.

## ( ६४ ) साकी.

॥ मार्गशीर्षकृष्णपक्षनवमी मंगल गोरजवेळा ॥
॥ अठराशेएकांत[1] भूपती विवाह भूषित झाला ॥
॥ मोदें[2] जन सारे ॥ उत्सव करिती प्रेमभरें ॥ १ ॥

१. शके १८०१. २. आनंदानें.

# राज्यारोहण.

## ( ६५ ) पद्य.

( " चाहो जो तमे नरेश देशनें करवा आबादान " ही चाल. )

॥ राष्ट्राच्या कल्याणार्थ अनुसरा **सयाजि** नृपतीला ॥
॥ महाराष्ट्रगुर्जरांग्लभाषानिपुणचि[1] ह्मणतीला ॥ ध्रु० ॥

॥ भरतभूनृपांत[2] जो पहिला ॥ स्वराज्यारोहणार्ह[3] झाला ॥
॥ प्रजाजन पावति हर्षाला ॥ अनुसरा० ॥ १ ॥

॥ गुजराथदेशिचे प्रजाजन सदा नृपवर सुखवाया ॥
॥ राज्याचें अधिकारसौख्य जनहितार्थ साधाया ॥

॥ झटोनी करी प्रयत्न भला ॥ सुयश हें सरटि माधवाला ॥
॥ अशास्तव मुहूर्त ठरवीला ॥ अनुसरा० ॥ २ ॥

१. मराठी गुजराथी व इंग्रजी या भाषांत प्रवीण. २. हिंदुस्थानांतील राजेलोकांत. ३. स्वतःच्या राज्यासनावर विराजमान होण्यास योग्य.

## ( ६६ ) पद्य.

( " अहो ब्रह्मनाद गाजे रुडो रास रच्यो आजे ब्रह्मांडमां " ही चाल. )

॥ स्वराज्यसुत्र घेई, अचल राज्यलक्ष्मिपाही, महीपती ॥
॥ निजप्रजासुखार्थ जो सदा निमग्न सन्मती ॥ ध्रु० ॥

॥ फरग्युसन बहु वर्णिती, पुण्यश्लोक नृपाळ ॥
॥ श्रीश **सयाजी** बहुगुणी, करो प्रजाप्रतिपाळ ॥
॥ सुनीतितत्व बोधुनी नृपास सत्य वैखरी[१] ॥
॥ स्वतंत्र राज्यकारभार देति भूपतीकरी ॥
॥ सुमित्रभाव शुद्ध ठेवि अंतरीं ॥ १ ॥ स्वराज्यसूत्र० ॥
॥ ज्ञानांजन[२] नृप निजजना, करावया मनि[३] दंग ॥
॥ अंतरंगिं[४] व्यासंगही, विद्येचेचि तरंग[५] ॥
॥ सुशिक्षणप्रभावभानु[६] आजि उदय पावला ॥
॥ गुरुजनां स्वजननिलाहि सुफळ लाभ जाहला ॥
॥ निजप्रजाजनांस हर्ष वाटला ॥ २ ॥ स्वराज्य सूत्र० ॥

१. वाणी. २. ज्ञानाचा स्पष्ट बोध. ३. अंतःकरणाचे ठायीं. ४. दृढाभ्यास. ५. लहरीं; लाटा ( हर हमेश चालू असलेले विचार ). ६. चांगल्याशिक्षणाच्या तेजोबळाचा सूर्य.

## ( ६७ ) पद्य

( " वाहवा थोर तु भूपाळा. "......ही चाल ).

॥ महदानंद खरो भूपतिच्या राज्यारोहणिं झाला ॥
॥ मुंबापुर प्रांतांतिल निवडक सज्जनसंघहि जमला ॥
॥ महोत्सव अपूर्व हा म्हणती ॥ कविही तद्वर्णन करिती ॥

## ( ६८ ) * पद्य

( " मुला सांग नृपतीस संदेश माझा "......ही चाल )

॥ प्रजानिष्ठ जो भूप जगीं श्रेष्ठ साचा ॥
॥ सत्य संकल्प हा या मनाचा ॥ ध्रु० ॥
॥ आजि राज्याधिकारागमें भूप मी, देइ हा अभयवर लेख करींचा ॥
॥ पुत्रपौत्रासमचि पाळुनी स्वप्रजा, नित्य सुखवीन ही सत्य वाचा ॥ १ ॥
॥ आंग्लनृपमित्र[1] यत्साह्य मज पूर्ण कीं, स्वजनगण राजनिष्ठचि असावा ॥
॥ योग हा लाभतां तुष्ट लक्ष्मीपती, करिल सांभाळ तो सज्जनांचा ॥
॥ प्रजानिष्ठ जो भूप ॥ ० ॥

१. नामदार इंग्रज सरकार.

* ( श्रीमंत सरकार सयाजीराव महाराजसाहेब यांहीं प्रजाजनांस जें वचन दिलें त्यांतील मुद्दे या पद्यांत घेतले आहेत. )

## ( ६९ ) * पद्य.

( राग असावरी अथवा "म्हातारा इतुका न अवघे पाउणशे वयमान" ही चाल).

॥ दीनांचा प्रतिपाळ करो हा धन्य **सयाजि** नृपाळ ॥
॥ सुखवृद्धी चिरकाळ ॥ करो हा० ॥ ध्रु० ॥
॥ सत्कीर्तिप्रद[1] सफळचि होवो, वाणी सत्य रसाळ ॥

॥ निजजनवात्सल्यें चिर गाजो, सद्यश धवल विशाळ ॥

॥ करो हा० ॥ १ ॥

॥ प्रजाप्रीति ही राष्ट्रोन्नतिची, सवत्स गाय दुधाळ ॥

॥ तत्वाचि हें नृपसुमनीं ठसवो, श्रीप्रभुदीनदयाळ ॥

॥ करो हा० ॥ २ ॥

१. चांगलें यश देणारी. २ प्रजेच्या प्रेमामुळें. ३. निर्मळ. ४. राष्ट्राच्या उत्कर्षाची. * ( प्रजाजनांकडून श्रीमंतांचें अभिनंदन यांत आहे. )

( ७० ) पद्य

( " वाहवा थोर तुं भूपाळा "......ही चाल. )

॥ पौषशुद्ध अष्टमी सौम्यवासरीं चंद्र मीनेचा ॥

॥ शक अठाराशेतीन सुवत्सर राज्यारोहणविधिचा ॥

॥ चिरायू भूप **सयाजी** हा ॥ मिळवो दिगंत कीर्ति महा ॥ ॥ १ ॥

( ७१ ) वसंततिलका ( मधुमाधवी )

॥ पुत्रापरी स्वजनपालनसिद्ध राहे ॥

॥ तेणेंचि होय बहु तुष्ट वसुंधरा हे ॥

॥ तो **श्री सयाजि** चिर राज्य करो क्षितीचें ॥

# प्रस्तावना.

॥ क्षत्रियस्य परो धर्मः प्रजानां परिपालनम् ॥

॥ तस्मात्सर्वप्रयत्नेन रक्षयेन्नृपतिः प्रजाः ॥ १ ॥

लघुस्मृति.

प्रजेला आनंदांत ठेवणें, सत्याचें पालन करणें, व्यवहारामध्यें सरळपणा असणें, धर्म, अर्थ व काम या पुरुषार्थत्रयीच्या रहस्याचें ज्ञान असणें, प्रजेचें नियमन करणें वगैरे; अशा विशिष्ठ गुणांनीं संपन्न असलेल्या राजाचीच सदैव प्रशंसा होते; आणि महाभारत वगैरे ऐतिहासिक ग्रंथांत राजाचा हाच सनातन धर्म असल्याबद्दल सांगितलें आहे. तसेंच कविकुलगुरू कालिदासानेंहि राजा हा प्रजेचा पिता आहे असें म्हटलें आहे. राजा व प्रजा यांचा अन्योन्य संबंध इतका निकट व उभयतांच्या कल्याणास परिपोषक आहे कीं प्रजाजनांची राजनिष्ठा व संघशक्ति त्याचप्रमाणें त्यांची नीती जर बरोबर नसेल तर राजाची सत्ता कितीही बलवत्तर असली तरी प्रजेचें पालन व रक्षण करण्यास ती असमर्थ होईल याकरितां त्यांचा परस्पर संबंध चांगला असला तरच देशाचें कल्याण होईल.

सांप्रतच्या या लघुकाव्याचे लेखक रा. रामराव मार्तंड भांबुरकर हे प्रतिवर्षी श्रीमकरसंक्रांतीच्या सुप्रसंगी श्रीमंत सरकार **सयाजीराव** महाराजसाहेब गायकवाड यांच्या चरणकमलीं अभीष्टप्रद पद्यें अव्याहत अर्पण करीत आहेत आणि त्यांची बूज होऊन त्यांस वेळोवेळीं त्याबद्दल उत्तेजनही मिळालें आहे. यांनीं गेल्यावर्षी श्री मकरसंक्रांतीप्रीत्यर्थ " श्री **सयाजी** वैभवानंदलहरी अथवा **मराठी भाषेच्या महिमा** " हें लघुकाव्य मराठी भाषेच्या गुणोत्कर्षासंबंधांत श्रीमंतांचे चरणीं अर्पण केलें असून त्यासंबंधांत इंग्रजी राज्यांतील चांगल्या विद्वानांची मान्यता मिळाली आहे. आणि तें या राज्यांतील मुलांच्या व मुलींच्या शाळांतून शालोपयोगी क्रमिक (टेक्सबुक्) पुस्तक ठरून चालू झालें आहे. श्रीमंत सरकार महाराजसाहेब यांच्या कारकीर्दीत प्रजेच्या हितार्थ कोण कोणत्या सुधारणा करण्यांत आल्या आहेत त्याचें थोडक्यांत दिग्दर्शन करावें असें मनांत आल्यावरून हल्लींचें " श्रीसयाजीराज्यशासनपद्धति " या नांवाचें हें लघुकाव्य श्रीमंत सरकार महाराज साहेब यांचे चरणीं लेखकाकडून अर्पण करण्यांत येत आहे.

प्रस्तुतच्या काव्यांत—राजानें सामान्यतः प्रजेच्या उत्पन्नाचा सहावा हिस्सा घेणें, करांच्या पैशांचा स्वतःच्या वैभवाकडे उपयोग न करितां प्रजेस त्यांचा योग्य मोबदला देणें, देशकालानुसार वर्तन व दान करणें, उदार बुद्धि बाळगणें; सर्व प्रजाजनांस

सुशिक्षित करणें, दूर प्रवास करून त्यापासून प्रजेच्या हितासाठीं ज्या कांहीं अनुकरणीय गोष्टी असतील त्या राज्यांत चालू करणें, प्रजेच्या हितांतच आपलें हित आहे हेंच मुख्य तत्व मानणें, लोकांस त्यांच्या योग्यतेनुरूप अधिकार देणें, प्रजाजनांच्या आरोग्याकडे लक्ष देणें वगैरे राज्य-शकट सुव्यवस्थित चालविण्याच्या ज्या सर्वमान्य पद्धती आहेत त्यांस अनुसरून सांप्रत राज्यांत म्युनिसिपालिट्या, पंचायती, मध्यस्थपंच, पाल्यपालक, धारासभा, कर्जग्रस्तांस कर्ज देण्यासंबंधीं नियम, सरकार अथवा सरकारी अंमलदार यांच्या विरुद्ध दिवाणींत दावे करण्याबद्दल नियम, डिस्ट्रिक्ट सॅनिटरी ॲड्वायसरी कमिटि, सेंट्रल् लायब्ररीची स्थापना, बडोदा कॉलेज वगैरे ज्या ठळक ठळक सुधारणा करण्यांत आल्या आहेत त्यांचें कविताबद्ध निरनिराळ्या वृत्तांत थोडक्यांत वर्णन सुरेख साधलें आहे.

हें वर्णन गद्यांत यापेक्षां जास्त विस्तारानें करतां आलें असतें; परंतु पद्यांचा परिणाम मोहक व आल्हादकारक असून मनावर तत्कालिक होतो व विशेषतः तरुणपिढीवर त्यांचा संस्कार चिरकाल राहण्याचा संभव असतो हें जाणून पद्यरूपानें हें वर्णन करण्यांत आलें आहे. मराठी शाळांतील मुलांस व मुलींस इतिहास विषयांत ज्याप्रमाणें गायकवाडी राज्याचा इतिहास शिकविण्यांत येतो त्याप्रमाणें शाळांतून साहित्यविषयांत या पद्यावलीचा उपयोग

केल्यास प्रजेसाठीं आपल्या राजानें काय केलें त्याचें ज्ञान त्यांस बाल्यावस्थेपासूनच होत जाईल.

**श्रीमंत सरकार सयाजीराव महाराजसाहेब गायकवाड** यांची कीर्ति काशीपासून रामेश्वरापावेतोंच काय तर हिंदुस्थानाबाहेरील देशांतही सुप्रसिद्ध आहे; त्यांस अनुलक्षूनच हल्लींची जी पद्यावली रचिली आहे ती **श्रीमंत सरकार महाराजसाहेब** यांहीं केलेल्या सुधारणांस अनुसरून यथायोग्य आहे.

| | |
|---|---|
| मु० **बडोदें.** | **कृष्णराव विनायक शार्ङ्गपाणी.** |
| ता. १–१–१६. | बडोदे राज्याचे माजी ना. दिवाण व |
| ता. १-१-१९२२. | वरिष्ठ न्यायाशीचे न्यायाधीश. |

# अभिप्राय.

या काव्यांत श्री. सयाजि महाराजांनीं आपल्या राज्यांत उदार धोरण स्वीकारून ज्या संस्था स्थापित केल्या आहेत व इतर सुधारणा अमलांत आणिल्या आहेत त्यांचें दिग्दर्शन केलें आहे. प्रजेचें हित तें राजाचें हित, प्रजा ज्ञानी तर राज्य संपन्न या तत्वांवर सर्व सुधारणा होत आहेत; त्यांकडे ब्रिटिश प्रांतांतील लोकांचें लक्ष लागलें आहे, व त्यांकडे बोट दाखवून तशा सुधारणा इकडेही अमलांत आणितां येतील असें ते ह्मणत आहेत.

काव्य लहान आहे तेव्हां या संस्थांचें किंवा सुधारणांचें वर्णन त्यांत नाहीं. शिक्षकावर हा भार टाकिला पाहिजे.

काव्यावर सविस्तृत अभिप्राय रा. रा. आप्पासाहेब शार्ङ्गपाणि यांनीं दिला आहे तो मला संमत आहे.

मु. अकोलें, }
ता. २१-१-१६. } वि. मो. महाजनि.

2942
ঢাকা (প্রথম খন্ড)

श्री.

# अनुक्रमणिका.


| पद्यांक | वृत्ताचें नांव | | विषय |
|---|---|---|---|
| १ | मंदाक्रान्ता | ... | मंगलाचरण व उद्देश. |
| २ | साकी | .... | षष्ठांशवृत्तीपेक्षां कमी अंश घेणें. |
| ३ | दिंडी | .... | योग्य कराचा योग्य मोबदला. |
| ४ | शार्दूलविक्रीडित | | राजा हाच प्रजेचा पिता होय. |
| ५ | पंचचामर | .... | प्रजाहितार्थ स्वराज्यरूपी घड्याळास स्वधर्मरूपी किल्ली देऊन हातांत बाळगणें व उदार बुद्धि ठेवणें. |
| ६ | पृथ्वी | .... | लोककल्याणाचीं कामें व लोकांस अधिकारदान. |
| ७ | शिखरिणी | ... | प्रवासवृत्तीचा लोकांवर सुपरिणाम. प्रजेचा अर्थ तोच स्वार्थ समजणें. |
| ८ | शुद्धकामदा | .... | म्युनिसिपालिटीस अधिकार देऊन सुधराइचीं कामें लोकसुखार्थ करविणें. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | आर्या | ... | पंचायती स्थापणें. |
| १० | सदर | .... | मध्यस्थपंचाची योजना. |
| ११ | स्वागता | .... | पाल्यपालकखातें. |
| १२ | वैतालीय | ... | समदृष्टीविषयीं. |
| १३ | हरिणी | .... | जेलकमिटि. |
| १४ | साकी | .... | सॅनिटरी एड्वाइसरी कमिटि. |
| १५ | अनुष्टुप् | ... | करांची माफी. |
| १६ | उपजाति | .... | जकातनाकीं बंद केलीं त्याबद्दल. |
| १७ | स्रग्धरा | .... | बडोदा कॉलेज व सेंट्रल लायब्ररी. |
| १८ | शालिनी | .... | विद्यारूपी फलांचा रसाळ वृक्ष राजा. |
| १९ | मालिनी | .... | कर्जग्रस्तांसाठीं कायदा. |
| २० | प्रहर्षिणी | .... | खात्याच्या निकालाविरुद्ध दिवाणींत दाद मागण्याची प्रजेस सवलत व धारासभा याविषयीं. |
| २१ | मत्तमयूरी | .... | सिल्वर ज्युबिलींत रथाचे घोडे सोडून रथास हातानें ओढून नेण्याचा सन्मान व प्रजेची राजनिष्ठा. |
| २२ | भूजंगप्रयात | .... | सत्कृत्यमाला अर्पण. |
| २३ | रथोद्धता | ... | राजा हा विष्णूरूप. |
| २४ | द्रुतविलंबित | ... | जय देणारी देवी विजय देवो. |

श्री.

# श्रीसयाजीराज्यशासनपद्धति.

## काव्य.

### ॥ मन्दाक्रान्ता. ॥

॥ श्रीवाग्देवीचरणकमला वन्दितो भक्तिभावें ॥
॥ स्वेच्छेनें जी कवनविषयीं सिद्धि देई प्रभावें ॥
॥ आहे कैसा वटपुरपति[1] स्वप्रजापाल[2] गाजी[3] ॥
॥ प्रेमें वर्णूं धवलसुयशा[4] धन्य राजा **सयाजी** ॥ १ ॥

१ बडोद्याचा राजा. २ आपल्या प्रजेचें पालन करणारा राजा. ३ बहादूर
४ सत्कीर्ति.

### ॥ साकी. ॥

॥ भोजादिक[1] षष्ठांशवृत्ति[2] जे भूप धन्य म्हणवीती ॥
॥ परि त्याहुनि अल्पांशाचि घेई प्रजाभाग[3] बुध[4] सुकृती[5] ॥
॥ निजजनवत्सल[6] हा ॥ गुणनिधि[7] **सयाजीराय** महा ॥२॥

१ भोज वगैरे राजे २ प्रजेच्या उत्पन्नाच्या सहाव्या भागाचा अधिकारी.
३ प्रजेच्या उत्पन्नाचा हिस्सा. ४ विद्वान्. ५ चांगल्या रितीनें वागणरा.
६ आपल्या प्रजेवर प्रेम करणारा. ७ सद्गुणाचा सागर.

## ॥ दिंडी. ॥

॥ प्रजेपासुनि कर नृपति योग्य घेई ॥
॥ प्रजोन्नत्यर्थचि[1] स्वांश[2] तोहि देई ॥
॥ जेवि रवि जल शोषूनि बाष्परूपें[3] ॥
॥ देइ शतगुणफल[4] भूस तोयरूपें[5] ॥ ३ ॥

१ प्रजेच्या उत्कर्षास्तव २. स्व+अंश=स्वांश=आपल्या खानगी द्रव्याचा भाग ( देणगी, बक्षीस वगैरे खानगींतून होणारा खर्च ). ३. वाफेच्या रूपानें. ४. शंभरपट फायदा. ५. पाण्याच्या रूपानें.

## ॥ शार्दूलविक्रीडित. ॥

॥ राजा जो स्वजनार्थपालन[1] सदा स्वापत्यभावें[2] करी ॥
॥ जाणा तोचि खरा प्रजाजनपिता आर्तीं[3] जनांच्या हरी ॥
॥ न्यायें पालनपोषणीं हितगुणीं[4] जो रंजवी स्वप्रजा ॥
॥ ऐसा लोकहितैकबुद्धि[5] सुकृती भूपाळ नाहीं दुजा ॥ ४ ॥

१. आपल्या प्रजेच्या मालमिळकतीचें संरक्षण. २. आपल्या मुलांचे ठायीं जसें आपलें प्रेम असतें त्या प्रेमभावानें. ३. दुःख, हाल. ४. (प्रजाजनांचें सदाचरण, त्यांची उपजीविका व त्यांचें संरक्षण या संयुक्त गुणांनीं). ५. आपल्या प्रजेचें कल्याणचिंतन याच एका विषयाकडे ज्याच्या बुद्धीची प्रवृत्ति आहे असा.

## ॥ पंचचामर. ॥

॥ स्वराज्यतंत्र[1] हें घव्याळ मानुनी निजांतरीं[2] ॥
॥ स्वधर्मकीलिका[3] सदैव देइ, ठेवि त्या करीं ॥
॥ प्रजाहितार्थ सूक्ष्म लक्ष देउनी नृपाग्रणी[4] ॥
॥ स्वकीय दानशील[5] तत्त्व राखि राज्यधोरणीं[6] ॥ ५ ॥

१. स्वराज्याचें सूत्र अथवा आपलें राज्य चालविण्याचा खरा मार्ग. २. आपल्या अंतःकरणांत. ३. स्वधर्मरूपी किल्ली. ४. राजांचा पुढारी. ५. उदार. ६. राज्य चालविण्याची जी सर्वमान्य शैली तिचे ठायीं.

## ॥ पृथ्वी. ॥

॥ प्रजाजननियुक्त[1] जे सुजन नेमुनी चालवी ॥
॥ सदैव उपयुक्त[2] तीं जनसुखार्थ कार्ये नवीं ॥
॥ स्वयेंचि[3] अधिकारभाग[4] विभु[5] देइ त्यांच्या करीं ॥
॥ असा कधिं दुजा मिळे न नृप, सत्य ही वैखरी[6] ॥ ६ ॥

१. आपल्या प्रजाजनांनीं निवडलेले. २. लोकोपयोगी. ३. आपण होऊन. ४. आपल्या अधिकाराचा अंश. ५. राजा. ६. वाणी.

## ॥ शिखरिणी. ॥

॥ प्रवासाची वृत्ति[1] प्रभु वरुनि[2] देशाटन करी ॥
॥ विदेशी तत्त्वें जीं हितें[3] निजजनां तीं अनुसरी ॥

॥ प्रजार्था जाणूनी सतत नृप जो स्वार्थचि ह्मणे ॥
॥ तया पुण्यश्लोक प्रवदति सुधी प्रांजलपणें ॥ १ ॥

१. स्थिति ( आवड ). २. पसंत करून. ३. हितकर. ४. प्रशंसनीय; मंगलप्रद. ५. विद्वानलोक.

## ॥ शुद्धकामदा ॥

॥ नगरपालिका लोकसंहती ॥ स्थापि नृप पुरीं साधिकार तीं ॥
॥ प्राज्ञजनसभा वाग्विवेचनें ॥ योजी नीतिचीं सौख्यसाधनें ॥ ८ ॥

१. म्युनिसिपालिटि; सुधराई. २. लोकमंडळ; लोकसंघ. ३. सुज्ञ लोकांचीं सभा.

## ॥ आर्या. ॥

॥ जिकडे तिकडे राज्यीं नेमुनि पंचायती स्वतंत्रपणें॥
॥ निजसत्तांशहि देउनि वाढवि जनभक्ति नृप अशा स्वगुणें ॥
१. आपल्या आधिकाराचा भाग.

॥ ज्यांनीं त्यांनीं अपुले निवडावे न्याय ह्मणुनि तो नेमी ॥
॥ मध्यस्थपंच धीमान् न्यायाधीशहि प्रबुद्ध जनकामीं ॥ १० ॥

१. ज्ञाते. २. दूरदर्शी.

## ॥ स्वागता. ॥

॥ पाल्यपालक हितप्रद खातें ॥ वाढवी सतत पाल्यसुखातें ॥
प्रीतिनें निजसुतां जननी तीं॥राखि तेवि नृपही जननीतीं[१]॥११॥

१. लोकांचें सदाचरण.

## ॥ वैतालीय. ॥

॥ समदृष्टि तुझी प्रजांवरी ॥ जन माता वदती तुला खरी ॥
॥ शिशुचें[१] हित जें न जाणते॥जननी, जाणशि सर्व सन्मते[२]॥१२॥

१. बालकाचें. २. हे सद्बुद्धिमान् राजा !

## ॥ हरिणी. ॥

॥ हृदय वितळे कारागारीं[१] जनार्ति विलोकुनी ॥
॥ सदय नृप तो प्राज्ञां नेमी तदा जनतारणीं ॥
॥ सुखविति तयां सत्ताधारें[२] सुधी मग ते त्वरें ॥
॥ जन विनवितीः– "देवा ! भूपा चिरायु करी वरें॥१३॥

१. बंदीखान्यांत; तुरुंगांत. २. अधिकाराच्या बळानें.

## ॥ साकी. ॥

॥ प्रजारोग्यवृद्ध्यर्थ साधनें सुखकर सुचवाया तीं ॥

॥ लोकनियुक्तचि पंच नेमुनी तदनुमोदनें[1] नृपती ॥
॥ प्रेमें मान्य करी ॥ सत्वर, जनार्ति[2] सर्व हरी ॥ १४ ॥

१. त्यांच्या संमतीनें. २. लोकांचें दुःख. ( हें पद्य डिस्ट्रिक्ट सॅनिटरी ऍड्वायझरी कमिटीस उद्देशून आहे ).

## ॥ अनुष्टुप्. ॥

॥ करग्रहें नैक[1] राजे मानिती हर्ष भूवरीं ॥
॥ करमोक्षें[2] मोदपूर्ण[3] क्वचित् पाहूं तुझ्यापरी ॥ १५ ॥

१. अनेक. २. करांची माफी. ३. आनंदानें पूर्ण; हर्षभरित.

## ॥ उपजाति. ॥

॥ केलीं नृपें बंद जकातनाकीं ॥
॥ उदारधी[1] तो सुखवी जनां कीं ॥
॥ भूपाळ तत्पूर्वज हृष्ट[2] नाकीं[3] ॥
॥ करो चिरंजीव तया पिनाकी[4] ॥ १६ ॥

१. उदारबुद्धि ज्याची आहे असा. २. प्रसन्न. ३. स्वर्गांत. ४. महादेव.

## ॥ स्रग्धरा. ॥

॥ राज्यामाजीं सुविद्या[1]-लय तुज न गमे हे प्रजातात राया ॥
॥ निर्मीलें त्वां सुविद्यालय म्हणुनि पुरीं सज्जनातें तराया ॥

॥ विद्यांच्या[3] प्रक्तरौरांस्तवहि वसविलें पुस्तकागोर[5] मोठें ॥
॥ ऐशी संस्था मिळेना विविधगुणयुता सुंदरा अन्य कोठें ॥१७॥

१. चांगल्या विद्येचा अभाव. २. सुविद्या+आलय=सुविद्यालय=चांगलें विद्यामंदिर ( बडोदे हायस्कुल व कॉलेज ). ३. विद्येच्या दृढाभ्यासांत मग्न ( गढून गेलेले ). ४. नागरीकांसाठीं. ५. सेंट्रललायब्ररी.

## ॥ शालिनी. ॥

॥ विद्यारूपें देतसे जो फळांना ॥ कीर्त्यामोदें[1] रंजवी देश नाना ॥
॥ द्रव्यच्छाया[2] देइ लोकां विशाळ ॥ राजा तो हा वृक्ष[3] वाटे रसाळ ॥ १८ ॥

१. यशोरूप सुवासानें. २. धनरूपी छाया. ३. आम्रवृक्ष.

## ॥ मालिनी. ॥

॥ ऋणचि बहु विषारी, कालकुटाहि[1] सारी[2] ॥
॥ स्वसुख असुहि[3] हारी, पुत्रपौत्रांहि मारी ॥
॥ सदय नृप ऋणारी[4], आर्तपीडा निवारी ॥
॥ धिरुनि धनहि भारी, भूप ऐशांस तारी ॥ १९ ॥

१. जाहलीम असें हलाहल विष. २. मागें हटवितें; पाडाव करतें. ३. प्राणसुद्धां. ४. ऋणाचा शत्रु ( कर्जग्रस्तांस कर्जमुक्त करण्याबद्दलच्या नियमांस उद्देशून हें पद्य आहे ).

## ॥ प्रहर्षिणी ॥

॥ न्यायाचे सकलहि ते सुमार्ग सारे ॥
॥ त्वां केले सुलभचि मोकळे नृपारे ! ॥
॥ पौरांना[1] नियमसभेंत[2] मान देशी ॥
॥ सत्कीर्तिध्वजहि तुझे उभे विदेशीं ॥ २० ॥

१. नागरिकांना २. धारासभेंत. ( सरकार व सरकारी अंमलदार यांच्या विरुद्ध दिवाणींत दावे करण्याविषयींच्या नियमांस व धारासभेस उद्देशून हें पद्य आहे. )

## ॥ मत्तमयूरी. ॥

॥ आत्मा देहा तेवि जनां हा प्रिय भूप ॥
॥ प्रेमें गाती उत्सवकालीं[1] कुरुदीप ॥
॥ " वाजी सोडूं ओढुं करानीं रथ आजी ॥
॥ राजा शोभे भूषण भूमीस सयाजी ॥ २१ ॥

१. ( सिल्वर ज्युबिली महोत्सवांतील टॉर्च लाइटच्या मिरवणुकीस उद्देशून हें पद्य आहे ). २. घोडे.

## ॥ भुजंगप्रयात. ॥

॥ बहू आदरें गुंफितो कृत्यमाला[1] ॥
॥ वसो ही तुझ्या हृत्प्रदेशीं नृपाळा ॥

॥ तुझीं कृत्यमाल्यें यशोरूप गंधें ॥
॥ विकासें दिसेना किती घेऊ मोदें ॥ २२ ॥

१. सत्कृत्याची माला. २. सत्कृत्यरूपी पुष्पें. ३. सत्कीर्तिरूपी. ४. प्रफुल्लित झाल्यानें.

॥ रथोद्धता. ॥

॥ विष्णु तूंच दिसशी नरेश्वरा ॥
॥ अंगनाहि तव दिव्य इंदिरा ॥
॥ गुर्जराधिपपुरी शुभंकरा ॥
वंदनार्ह गमते परंपरा ॥ २३ ॥

१. लक्ष्मी. २. बडोदें. ३. मंगलप्रद. ४. वंदनास योग्य; वंदनीय. ५. अनुक्रम.

॥ द्रुतविलंबित. ॥

॥ विमलधी बहुमान्य जनास जो ॥
॥ विजयदा जयदानिं तया सजो ॥
॥ निजजनावनदक्ष सर्दार तो ॥
॥ नृप **सयाजि** सुखांत सदा रंतो ॥ २४ ॥

१. शुद्धांतःकरणाचा. २. जयदेणारी देवता. ३. जय देण्यांत. ४. सिद्ध असो. आपल्या प्रजाजनांचें रक्षण करण्यास समर्थ. ६. आपल्या भार्येसह. ७. रममाण होवो.

A panegyric Poem written in praise of His Highness Shri Sayajee Rao Maharaja Saheb Gaikwad.

# श्रीसयाजी–प्रशस्ति.

( लेखक व प्रकाशक रामराव मार्तंड भांबुरकर. )

## प्रवेशन.

॥ ना ऋषिः कुरुते काव्यं ॥ ना रुद्रः क्रमपाठकः ॥
॥ ना देवांशो ददत्यन्नं ॥ ना विष्णुः पृथ्वीपतिः॥ १॥

पृथ्वीपती ह्मणजे राजा व भक्तवत्सल श्रीमहाविष्णूचाच तो अंश होय. ज्याप्रमाणें श्रीमहाविष्णूची पूजा व आराधना केली असतां भगवद्भक्त परम सुखाला पावतात त्याप्रमाणें प्रजावत्सल राजाच्या स्तुतिपाठांचीं पारायणें केलीं असतां राजा व प्रजा यांचें अन्योन्य प्रेम वाढत जाऊन प्रजाजन परम सुखाला पावतात. मनुष्य जन्माला येऊन मनुष्येश्वर ( राजा ) या पदाला पावणें हें केवळ पूर्व सुकृतांचेंच फळ होय. शिरोभागीं दिलेल्या श्लोकांत दर्शविल्याप्रमाणें राजा हा जसा महाविष्णूचा अंश आहे तसा कवि हा ऋषीचाच अंश होय. पौराणिक काळांत राजे लोक ऋषींना पूज्य मानून त्यांच्या आज्ञा मान्य करीत असत, आणि यज्ञयागादि कर्मांत विघ्न करणाऱ्या दानवापासून ते त्यांचें संरक्षण करीत असतः—म्हणजे ऋषींचें वाग्वीर्य ( युक्ति ) व राजांचें

बाहुवीर्य (शक्ति) यांच्या संयोगानें राष्ट्राची उन्नति होत होती. कलियुगांत हे सर्व ऋषी कवींच्या रूपानें अवतरले; त्यांत भगवद्‌भक्त मुकुंदराज, ज्ञानदेव, तुकाराम, श्रीसमर्थ रामदासादि भक्तकवी केवळ लोककल्याणार्थ आणि सरस्वतीभक्त कालिदास, भवभूति, जगन्नाथ पंडितादि रससिद्ध असे साहित्यकवि वाङ्मयाच्या प्रसारार्थ अवतरले. हे सर्व कवी महर्षींचेच अंश होत. सुमारें दोन अडीचशे वर्षांपूर्वी जे राजे होऊन गेले ते कवींना राष्ट्राचें जीवन समजून राजाश्रयाला ठेवीत असत व त्यांना पूज्य मानून त्यांचा बहुमान करीत असत. तात्पर्य असें कीं सर्व कवी हे ऋषींचे अंश आहेत व राष्ट्राच्या उन्नत्यर्थ ते सर्व राजश्रयास पात्र आहेत.

२. सांप्रत **श्रीसयाजीप्रशस्ति** नांवाचें लघुकाव्य श्री. स. परमकृपाळू **श्रीसयाजीराव महाराज गायकवाड** यांच्या चरणारविंदीं रा. रामराव मार्तंड भांबुरकर यांचे कडून आज बरींच वर्षें चालत आलेल्या त्यांच्या अव्याहत क्रमाप्रमाणें अर्पण करण्यांत येत आहे हें मोठें स्तुत्य व अभिनंदनीय कृत्य होय. आर्या हें गेय वृत्त असून नवरससिद्ध आहे व तेंच वृत्त कवीनें **श्रीसयाजीप्रशस्ती**साठीं योजिलें आहे हेंही अत्यंत प्रशस्त होय. हें काव्य ४८ आर्यांचें असून आर्यांधींत ९६ आद्याक्षरें श्री. स. महाराजसाहेब यांना उद्देशून सार्थ साधलीं आहेत तीं येणेंप्रमाणें:—

"श्रीमंत सयाजीराव महाराज!

सेवक रामराव भांबुरकर श्रीपद कमलीं रत होऊन विनवितो कीं श्री. महाराज साहेब, श्री. अ. सौ. मातुश्री महाराणी साहेब व श्री. प्रतापसिंह युवराजादिकांशां नाप्रभू चिरायु करो.

आज्ञाधारक,

**रामराव मा. भा.**

**शुभं."**

अशा प्रकारचीं आद्याक्षरें साधून काव्यरूपानें कोणताहि विषय यथार्थ लिहिणें हें काम विशेष बुद्धिकौशल्याचें आहे हें कोणीही कबूल करील. श्री. सरकार यांच्या अप्रसिद्ध अशा बाल्यचरित्रांतून रसोत्पत्तीचा विषय संगीत रूपानें प्रथम वर्णन करून नंतर श्रीमंतांची राज्यशासनपद्धति संक्षिप्त काव्यरूपानें वर्णिली आहे आणि त्याला ही **श्रीसयाजीप्रशस्ति** जोडिल्यानें कवींचें हें त्रिगुणात्मक लघुकाव्य सर्वांगसुंदर होऊन दुधांत साखर पडल्याप्रमाणें अधिक गोड झालें आहे.

उदाहरणार्थः—आर्याक ४१.

॥ युष्मत्कुलांत गोकुलपालन कुळधर्म हा विमल राया ॥
॥ करिशि सदा द्विजरक्षण हें व्रतपालन भवार्णव तराया ॥ ४१ ॥

या आर्यार्धांत कवीनें वृत्त्यनुप्रास नांवाचा शब्दालंकार पूर्ण साधला आहे; अशा रसोत्पत्तीच्या आर्या या काव्यांत पुष्कळ असून त्यांत प्रसादगुण स्पष्ट दिसत आहे. महाराष्ट्र सरस्वतीचे निस्सीम भक्त श्रीयुत वि. मो. महाजनि, श्रीयुत कृ. वि. आप्पासाहेब शार्ङ्गपाणी व कै. हरि नारायण आपटे यांचे जे अभिप्राय या पुस्तकासंबंधांत झाले आहेत ते मला सर्वथैव मान्य आहेत. पुष्पदंताच्या महिम्नाप्रमाणें कवीनें **मराठी भाषेच्या महिमा** वर्णन केला आहे आणि या पुस्तकाचा सर्व मुलांच्या व मुलींच्या मराठी शाळांतून क्रमिक पुस्तक म्हणून जसा हल्लीं उपयोग होत आहे तसा या **श्रीसयाजीवृत्तरत्नमंजूषा ( शासनपद्धति व प्रशस्तीसहित )** काव्याचा उपयोग संगीत शाळा वगैरे सर्व मराठी शाळांतून व्हावा आणि पुराणिक, कीर्तनकार व व्याख्याते यांनाही या उपयुक्त पुस्तकाचा उत्तम लाभ घेतां येईल असें मला वाटतें.

३. पुस्तकाच्या प्रारंभीं राजदंपतीच्या ठायीं वरदहस्ता अशा श्रीलक्ष्मी व श्रीसरस्वती यांचा एकत्र वास हृदयंगम अशा चित्ररूपानें दाखविला आहे आणि त्यास राजदंपतीच्या गुणवर्णनाचीं पद्यें जोडिलीं आहेत तीं यथार्थ आहेत. अशा राजदंपतीला श्रीमार्कंडेय यांचें आयुष्य चिंतून व कवींची सदिच्छा सफळ होवो असें श्रीचरणीं विनवून हें प्रवेशन संपवितों. बडोदें, ता. ६ जानेवारी १९२२.

( सही ) **माधवयोवा आन्यायोवा त्रिंबककर,**

श्रीमंत स. महाराज सा. यांचे आश्रित कीर्तनकार.

ॐ

# श्रीसयाजीप्रशस्ति.

॥ आर्या ॥

श्री-धी तशी सती स्त्री वेणित्रयसंगमें प्रयागचि तो ॥
मंगलगुणकीर्तीचा प्रवाह कल्याणदानरत निघतो ॥ १ ॥
तत्पाविञ्य महत्पददातृत्व शुभंकरत्व गाजतसे ॥
सज्ञानधनयशें मज राय **सयाजी**हि वाटती तैसे ॥ २॥
यारूपें आजि गमे भारतभाग्योदधीच अवतरला ॥
जीवितहितपर येथें स्नानें पानें कितीक जन तरला ॥ ३ ॥
राव असो रंक असो कृपाप्रसादेंचि रंजवी सर्वां ॥
वर्ते सुविचारपथें निंदास्तुतिची करी न मग पर्वा ॥ ४ ॥
मद मदिरामदनाचा नाहीं माहीत ज्याचिया चित्ता ॥
हात सरे सद्धर्मी तो न्यायपथेंच गाजवी सत्ता ॥ ५ ॥

राहे एकपणें जो देशाचि ज्यातें स्वदेहगमला हो ॥
जन धन्य धन्य ह्मणती सुजना याहून कोणता लाहो ॥ ६ ॥
सैन्य प्रभु सुजन असा मिळतां राहे प्रजाहि संतुष्ट ॥
वज्रसदृश निजभुजबळ मिरवील कशास होउनी रुष्ट ॥ ७ ॥
करिती स्तवन यथोचित वंदुनि तुज सकल चतुर सज्जन जें ॥
राष्ट्रकुलोत्सवसमयीं तव सत्कृतिविजयदुंदुभी गरजे ॥ ८ ॥
महिमा अगाध हा तव थोरमुखें धीर दूर जो गाती ॥
राया ! एकमुखें तो गाया माझी न शक्ति या गीतीं ॥ ९ ॥
वचनीं येइ मनोगत—ऊत न मज आवरावया ये तो ॥
भांडार सद्गुणांचें तव पाहुनि हर्षही उचंबळतो ॥ १० ॥
बुध तीर्थ हें त्रिवेणी धीश्रीस्त्रीरूप साधुनी येती ॥
रसरंगदंग भाविक मकरार्कीं लाभ हा सदा घेती ॥ ११ ॥
कयनप्रबंध हा मम ससिततिलमिषें करीं समर्पाया ॥
रचिला यथाक्रमें म्या संक्रातीशुभमुहूर्त साधाया ॥ १२ ॥

श्रीगुर्जरेश भूपा ! स्तवनोचित धवल तव सुयश मोठें ॥
परि मन्मति अल्पच तरि गाया तें बहुत हर्ष मज वाटे ॥ १३ ॥

दळ दिव्य तव नृपा हें ठेवियलें निज जनार्ति निरसाया ॥
करिशी पालन अमुचें परोपकारार्थ शिणविशी काया ॥ १४ ॥

मनुजाधिप तव पूर्वज झाले रणरंगभूमिवर वीर ॥
लीला पाहुनि स्वर्गीं ढाळिति मोदाश्रुचे महापूर ॥ १५ ॥

रमणीय आज कितितरि; होति नृपा तव जुनाट जी नगरी ॥
तन्वी रूपगुणांनीं आता जणु शोभते नवी नवरी ॥ १६ ॥

"हो संपन्न सये तूं दुस्थिति तव विसर" वदति भूप तिला ॥
ऊर्जित झाली म्हणुनी मानी ती धन्य धन्य भूपतिला ॥ १७ ॥

नव पौरगृहें दिसतीं ठायीं ठायींहि भव्य अतिरुचिर ॥
विलसति स्वनगरीचीं जणु आभरणें असोत हीं सुचिर ॥ १८ ॥

नजरानजरीं सुंदर नजराणे होति तो नजरबाग ॥
विमल जलाशययुत जो सांगे "अकलंक तूं नृपा वाग" ॥१९॥

तो दिव्य राजवाडा लक्ष्मीचा वास नित्य त्यामाजीं ॥
कीं विष्णूसह लक्ष्मी-विलास करि ती तिथें सदा राजी ॥२०॥
श्री. वाग्देवी एका ठायीं न; सिद्धांत हा जरी साचा ॥
मत्सर विसरति नृपगृहिं निवास त्यांचा सदा आनंदाचा ॥२१॥
हा संभ्रम मज वाटे विद्या-लय तुजसि नावडे राया ॥
राज्यांत स्थापिलें कां ! मग विद्यालय जनांस ताराया ॥ २२ ॥
जनचित्त रंजवाया बोधाया बहुत ग्रंथ रचवीले ॥
साहित्यशिक्षणीं नरनारी रंगूनि दंग बहु झाले ॥ २३ ॥
हे लोकशिक्षणाचें युग केलें त्वां सुरू महाराजा ॥
बलि जेवि कलियुगाचा आद्य घटक तो **परीक्षिती** राजा ॥२४॥
श्री. विद्यामृतपाना जलपाना समचि लेखुनी सजला ॥
अ. नुभव द्याया तूं या उभयांचें पान निजजनां सकलां ॥ २५ ॥
सौ. जन्यसुविद्याद्वयवृद्धी शुक्लेंदुची जशी सुकला ॥
मान्य दिसे तव राज्यीं भूषण हें श्रेष्ठ सत्य राजकुला ॥ २६ ॥

तुच्छ न गणशी कोणा सकलांनाही समान लेखून ॥
श्रीविद्यौषधपानें तारिशि अज्ञानरोग निरसून ॥ २७ ॥

"मज वाचतां न येतें" कानिं कुणाच्याहि वाक्य हें नलगे ॥
हा अनुभव मज येई पाहुनि शाळा बहु मुली मुलगे ॥२८॥

राज्यीं नर वा नारी विद्याभरणा विना गति न त्यांना ॥
"णी"कारांतीं पाणी त्याविण जैसी नसे गति जनांना ॥ २९ ॥

साधन उद्योगाचें निर्मियलें नगरिं त्वां कलाभुवन ॥
हे आलस्याहुतिचें आरंभियलें नृपा ! महा हवन ॥ ३० ॥

बहुजनहितहेतूंची साधनसंपत्ति जी तुला दिसते ॥
वसविशि येथें आणुनि देशिविदेशी जनांस बहु रुचते ॥ ३१ ॥

श्री. संस्कृततनया जी भारतभाषा मराठि नाम जिचें ॥
प्रथम तिचें संपादन केलें राजन्य ! हें उचित तुमचें ॥ ३२ ॥

ताराया स्वजनांते जनपदभाषेंत ग्रंथ करवीशी ॥
परवाङ्मयमथितही बोधज्ञानें जनांस रंजविशी ॥ ३३ ॥

सिंचुनि द्रव्यामृत कीं सजीव केले अमोल उपयुक्त ॥
हस्तलिखित जैनांचे ग्रंथसुवृक्ष प्रसिद्ध बहु उन्नित ॥ ३४ ॥
युक्तीशक्तिप्रभुता निजपरभाषेवरी जशी नृवरा ॥
वक्तृत्वें गाजविशी स्त्रीवरि गाजवि सदा जसा नवरा ॥ ३५ ॥
राया ! बाहुबलाहुनि विद्याप्राबल्य वाटतें धन्य ॥
जास्त म्हणुनि विद्यानग सुगम्य केला असा कुठें नान्य ॥३६॥
दिव्य प्रकृति जनांची करिशी ज्ञानौषधें सुधाराया ॥
खास मला वाटे कीं पाजिशि तीतें नवी सुधा राया! ॥ ३७ ॥
शांत स्वभाव, विद्या, सुधारणोदय, सुखप्रवासरति, ॥
नानार्थी समदृष्टी, हीं तत्वें प्राण पंच तुज गमती ॥ ३८ ॥
प्रत्येक देश शोधिशि स्वजनांस्तव सर्व सूक्ष्म दृष्टीनें ॥
भुपाळा ! या जगिं तूं कृतार्थ म्हणविशि सदैव उपकृतिनें॥३९॥
चित्रकलभिज्ञ चतुर शिल्पकलानिपुण सुजन बहु वसती ॥
राज्यीं तवाश्रयानें उत्तम कर्तृत्व नित्य दाखविती ॥ ४० ॥
युष्मत्कुलांत गोकुलपालन कुलधर्म हा विमल राया ! ॥
करिशि सदा द्विजररक्षण हें व्रतपालन भवार्णव तराया ॥४१॥

सो. को. २००५



रोगिभवनिं जातां तव समदृष्टी कीं नृपा ! सतत दिसती ॥
आहे अदृश्यरूपें वाटे येथें कुणी पुराण सती ॥ ४२ ॥
ज्ञाते नयनीतीचे योजियले न्यायमंदिरीं तेही ॥
धार्मिक सद्वृत्तीचे नृपसत्कीर्ती अखंड नांदो ही ॥ ४३ ॥
रव बहु कर्कश जीचा वेगहि अति तीव्र बघुनि मोटार ॥
कलिमालिन दुराचारां भासे चिरडूनि करि अहो ठार ॥४४॥
राज्यीं योजी साक्षर मोठे सद्वृत्त बहुत अधिकारी ॥
मग नृपकुशाग्रमतिचें सयश पसरेल कां न हो भारी ॥ ४५ ॥
राजकुलज राजासहि विद्यासंपन्न सर्व दिसतात ॥
वत्सल तूं दीनांचा गुणगण वर्णूं किती अहो तात ! ॥ ४६ ॥
मान्य सदा जे राजे श्रीधीसंस्कारयुक्त तव तुल्य ॥
भारतभू त्यां प्रसवो ज्यांच्या गुणमंडना नसे मूल्य ॥४७॥
शुद्धप्रेमें कृष्णप्रतिपद्दिनिं पौषमासिं संक्रांती ॥
भंडार नृपयशाचें वृद्धिगत ही करो तिला प्रणती ॥४८॥

## कठीण शब्दांचा स्पष्टार्थ.

१ श्री=संपत्ति. धी=बुद्धि. वेणित्रयसंगमें=श्री, धी व स्त्री या तिहींच्या संयोगामुळें. प्रयाग=प्रयाग या नांवाचें महातीर्थ; अलाहाबाद. मंगलगुणकीर्तीचा=कल्याण, गुण व यश यांचा. प्रवाह=ओघ. कल्याणदानरत=चांगली फलश्रुति देण्याला तत्पर.

२ तत्पावित्र्यः—त्याचा निर्मळपणा. महत्पददातृत्वः—मोठी जागा देण्याचा अधिकार. शुभंकरत्वः—सौभाग्य ( देणारें. ) सज्ञानधनयशें:—ज्ञान, संपत्ति व कीर्ति यांनीं युक्त (असल्यानें.)

३ भारतभाग्योदधीः—भरतखंडांतील लोकांच्या सुदैवाचा समुद्र. जीवितहितपरः—स्वतःच्या कल्याणाविषयीं तत्पर.

५ मदः—गर्व. मदिरामदनाचाः—मद्याचा व कामाचा.

६ एकपणें:—ऐक्यानें. लाहोः—हाव.

७ वज्रसदृशः—वज्रासारखें.

८ राष्ट्रकलोत्सवः—राष्ट्रांतील कलांचा उत्सव. संत्कृतिविजयदुंदुभीः—चांगलीं कामें करून संपादन केलेल्या यशाचे नगारे.

१० मनोगत-ऊतः—अंतःकरणांतील विचारांचा भर. तोः—ऊत तवः—महाराजसाहेबांचे.

११ मकरार्कीः—मकर राशीचा सूर्य असतो त्या दिवसांत.

१२ससिततिलमिषें:—शर्करायुक्त तिळांच्या रूपानें.

१३ धवलः—शुभ्र. निर्मळ.

१४ दळः—सैन्य, जनार्तिः—प्रजाजनांच्या पीडा. निरसायाः—दूर करण्यासाठीं.

१५ मनुजाधिपः—राजे. मोदाश्रुचेः—अत्यानंदाच्या अश्रूंचे.

१६ तन्वीः—सुंदर.

१७ भूपः—नगर पाहण्यास आलेले राजे. ऊर्जितः—स्वच्छ. उजळ भूपतिलाः—श्री. महाराजसाहेबाला.

१८ पौरगृहें:—पुरांत ( नगरांत ) राहणारे ते पौर, त्यांचीं घरें. आभरणें:—अलंकार.

१९ नजरानजरीं:—दृष्टिभर पाहण्यांत. विमलजलाशयः—निर्मळ पाणी ज्यांत आहे असा पाण्याचा साठा. अकलंकः—निष्कलंक; निष्पाप.

२१ श्रीवाग्देवीः—लक्ष्मी व सरस्वती. एका ठायीं नः—एका ठिकाणीं ( एकत्र ) राहत नाहींत हा सिद्धांत. नृपगृहीं:—राजगृहीं (जेथें जेथें श्री सयाजीराव महाराजांचें वास्तव्य असेल त्या त्या ठिकाणीं, )

२२ विद्या+लयः—विद्येचा लय (अभाव). विद्यालयः—विद्या + आलयः—विद्येचें पीठः—शाळा; पाठशाळा वगैरे.

२३ वाङ्मयाचें शिक्षण तेंच साहित्यशिक्षण.

२४ बलिः-बलवान परीक्षिती राजा. आद्यघटकः-मूळ चालक. परीक्षिती राजाः-अर्जुनाचा नातू

२५ श्रीविद्यामृतपानः-श्री + विद्याः-द्रव्य व विद्या यांचें अमृततुल्य प्राशन. जलपानः-उदकाचें प्राशन. ( ज्या प्रमाणें पाण्याचे नळ आणून पाण्याचें सुख प्रजाजनाला दिलें तसें पाण्यासारखा पैसा खर्चून विद्येचा सर्वत्र प्रसार केला व प्रजा सुखी केली. )

२६ सौजन्यसुविद्याद्वयवृद्धीः-सुजनाचा जो भावः-सौजन्य+सुविद्या या दोहोंची वाढ ( भरभराट ). शुक्लेंदुचीः-शुद्ध पक्षांतल्या-चंद्राची.

२८ नलगः-( ऐकूं ) येत नाहीं.

२९ ( विद्यारूपी अलंकारावाचून गति नाहींः-अवश्यक शिक्षणाची योजना केली म्हणून ). ( ज्याच्या अंतीं "णी" हें अक्षर आहे असा शब्द "पाणी" होय; आणि जसें पाणी हें मनुष्याचें जीवन आहे तसेंच विद्येचें शिक्षण हें प्रत्येकाचें जीवनच समजून तें अत्यावश्यक योजण्यांत आलें. )

३० ( मोठा होम करून त्यांत आळसाची आहुती देणें म्हणजे आळसाचा नाश करणें )

३१ ( प्रजाजनांच्या कल्याणाला कारणीभूत अशीं साधनें .)

३२ ( संस्कृतभाषेची कन्या अशी भरतखंडांतील लोकांची मातृ-भाषा मराठी ).

१३ जनपदभाषाः—देशी भाषा. परवाङ्मयमथितः—विदेशी भाषेतून तयार केलेले. बोधज्ञानें:—बोधजन्यज्ञानानें.

१४ ग्रंथरूपी उत्तम वृक्ष.

१५ प्रभुताः—सत्ता. नृवराः—नरश्रेष्ठाः—राजा.

१६ विद्यानगः—विद्यारुपी पर्वत. सुगम्यः—संचाराला सुखकर.

१७ तीते:—प्रकृतीला.

१८ रतिः—आवड. नानार्थीः—अनेक प्रकारच्या विषयांत.

१९ उपकृतिनें:—उपकारामुळें.

४१ गोकुलपालनः—गायींचे संरक्षण, इंद्रियदमन. द्विजरक्षणः—ब्राम्हणांचें संरक्षण. भवार्णव=संसाररूपी समुद्र.

४२ रोगिभवनें: -दवाखाने. पुराणसतीः -पुराणपतिव्रतापार्वती माता.

४३ न्यायमंदिरीं:--बडोदें येथील न्यायमंदिरांत.

४४ कलिमलिन दुराचारां:—कलियुगांतील भ्रष्ट दुराचाराला.

४५ साक्षरः—विद्वान, पदवीधर. कुशाग्रमतिः-तीव्रबुद्धि.

४६ तातः—( राजा हा प्रजेचा पिता ).

४७ भारतभूः—भरतखंड.

४८ प्रणतीः—वंदन. नमन.

दा. क्र. २५५२

विविधज्ञानविस्तार मासिकांत प्रसिद्ध झालेले

# अभिप्राय

१ "**मराठी भाषेचा महिमा**" ( श्री सयाजी वैभवानंदलहरी ):-—एका वर्षांत या काव्याची द्वितीयावृत्ति काढण्याचा सुयोग यावा ही गोष्ट काव्याच्या चांगुलपणाची साक्ष असून कवि रा. रामराव मार्तंड भांबुरकर, बडोदें, यांस भूषणावह आहे. यांतील उतारा विस्ताराच्या गेल्या फेब्रुवारीच्या अंकांत दिला आहे. रा. ब. महाजनि यांनीं म्हटल्याप्रमाणें हें पुस्तक मुलांस बक्षीस देण्यास योग्य आहे. बडोद्यांतील मराठी शाळांत तर हें टेक्स्टबुक ( क्रमिक पुस्तक ) ठरलेंच आहे. किं. अडीच आणे.

२. **श्रीसयाजीराज्यशासनपद्धति**—श्री. सयाजीराव महाराजांच्या कारकीर्दींत बडोदें संस्थानांत ज्या सुधारणा अमलांत आल्या त्यांचें कविताबद्ध वर्णन या काव्यांत आहे. हें काव्यही कवि रा. भांबुरकर यांचेंच असून त्यांच्या पहिल्या काव्याप्रमाणेंच सुरेख साधलें आहे.

---

# जाहिरात.

**पंडित जगन्नाथराय** ( मिश्रविवाह ) आणि "**भामिनी**" ( गुण अधिक किंवा धन अधिक ) हीं अनुक्रमें ऐतिहासिक व सामाजिक तसेंच मनोरंजक व बोधपर अशीं दोन नाटकें लवकरच प्रसिद्ध होणार आहेत.

---

REFBK-0002152

2952